
• पंढरपूर • सोमवार, २३ सप्टेंबर २०२४
• किंमत ₹ ४ • पाने : ८

# पंढरी संचार

pandharisanchar.com | RNI-MAH-MAR/1499/2000 | • वर्ष २९ • अंक - १२८

विधानसभेच्या तयारीला वेग, निवडणूक आयोगाचा दौरा; लवकरच... PII



'फार्मा इंडस्ट्री' आणि 'टॅबलेट कोटिंग' मधील नवीन तंत्रज्ञान आणि संशोधन... PIII

## मनसे उमेदवार दिलीप धोत्रे यांनी घेतली प्रचारात आघाडी

# इतर पक्षाचे उमेदवार कागदावरच!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात मनसेने दिलीप धोत्रे यांना उमेदवारी दिली आहे. यामुळे धोत्रे यांनी प्रचारास सुरुवात केली असून त्यांचे कार्यकर्ते वाड्यावर जाऊन धोत्रे यांचे कार्य मतदारापर्यंत पोहोचवीत आहेत. तसेच धोत्रे विविध कार्यक्रम घेऊन मतदारांची संपर्क ठेवत आहेत. यामुळे मतदार संघात धोत्रे यांनी प्रचारात आघाडी घेतली आहे. मात्र इतर पक्षाचे उमेदवार अद्यापही कागदावरच असल्याचे दिसून येत आहे. पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यात दिलीप धोत्रे यांचे काम चांगले आहे. कोरोना काळात त्यांनी अनेक नागरिकांना मदत केली आहे. पंढरपुरात कॉरिडॉर ला विरोध करण्यासाठी त्यांनी नागरिकांसमवेत मोठा भव्य मोर्चा नगर परिषदेवर काढला होता. तसेच पंढरपूर नगरपरिषदेने करात वाढ केल्यानंतर धोत्रे यांनी यास विरोध करून तो रद्द करण्यासाठी प्रयत्न केला आहे. पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यात विविध



कार्यक्रम घेऊन त्यांनी मतदारांची संपर्क ठेवणे सुरू केले आहे. गेल्या अनेक वर्षापासून राजकीय नेते मुस्लिम समाजाकडे दुर्लक्ष करत आहेत. याची दखल घेऊन धोत्रे यांनी मुस्लिम समाजातील एक हजार नागरिकांना तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी दर्शनासाठी पाठविले. ईद-ए-मिलाद निमित्य काढण्यात आलेल्या रॅलीत सहभाग घेतला. पंढरपुरातील डॉक्टर अभियंते यांच्याकडे लक्ष केंद्रित करून त्यांचा सत्कार केला आहे. तसेच गौरी गणपती सणाच्या पार्श्वभूमीवर सजावटीची स्पर्धा आयोजित केली होती. या महिलांचा चांगला प्रतिसाद मिळाला असल्याचे दिसून आले . धोत्रे यांनी प्रचारात आघाडी घेतली असून त्यांचे कार्यकर्ते पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील वाड्यावर घरापर्यंत जाऊन नागरिकांना धोत्रे यांनी आतापर्यंत केलेल्या कामाची माहिती देत आहेत. तसेच संपर्क साधण्यासाठी मोबाईल नंबर घेत आहेत. एकंदरीत धोत्रे हे मतदारांच्या होम टू होम पर्यंत जाऊन पोहोचले असल्याचे दिसून येत आहे. रविवारी मंगळवेढा येथे भव्य कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. याचे उद्घाटन करण्यासाठी मनसेचे युवानेते अमित ठाकरे उपस्थित राहणार आहेत. एकंदरीत विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून धोत्रे मतदारापर्यंत पोहोचत असून त्यांनी प्रचारात आघाडी घेतली असल्याचे दिसून येत आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला सोलापूर जिल्ह्यात चांगले यश मिळाले आहे. यामुळे महाविकास आघाडीची ताकद वाढली आहे. म्हणून आगामी विधानसभा निवडणुकीत उमेदवारी मिळावी म्हणून अनेक नेत्यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांशी संपर्क सुरू केला आहे. पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात उमेदवारी मिळावी म्हणून अनेक मातब्बर नेत्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष खासदार शरद पवार यांची भेट घेतली आहे. यात भगीरथ भालके, वसंतनाना देशमुख, नागेश भोसले, अनिल सावंत, सुभाष भोसले, राहुल शहा यांच्या नावांचा समावेश आहे. सोलापूर जिल्ह्यातील अनेक नेते मंडळी निवडणुकीत उभा राहण्याची तयारी सुरू केली आहे. मात्र अद्याप कोणत्याही पक्षाने उमेदवार जाहीर केले नाहीत. उमेदवारांची नावे कागदावरच असल्याचे दिसून येत आहे. मात्र विधानसभा निवडणुकीत पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात दिलीप धोत्रे यांनी आघाडी घेतली असल्याचे दिसून येत आहे.

> ● मनसे उमेदवार दिलीप धोत्रे यांना विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांची साथ मिळाली आहे. पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यात विठ्ठल कारखान्याचे अनेक सभासद आहेत. यामुळे याचा फायदा निवडणुकीत होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

## At a Glance

### शेत जमिनीच्या कारणावरून मारहाणीचा गुन्हा दाखल



**सांगोला :** शेत जमिनीच्या कारणावरून भावकीतील तिघांनी मिळून लाथा बुक्क्यांनी दोन भावांना जखमी केले. ही घटना शनिवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास सांगोला तालुक्यातील पाचेगाव बुद्रुक येथे घडली. यावेळी भांडण सोडवण्यासाठी मध्ये आलेल्या पत्नीच्या गळ्यातील मंगळसूत्र कुठेतरी पडून गहाळ झाले. याबाबत अर्जुन भागवत सरगर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सावळाराम सरगर, सजाबाई सरगर, कल्पना सरगर, दादा सरगर राहणार सर्वजण पाचेगाव यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### विवाहितेला पैशांची मागणी; पाच जणांविरुद्ध गुन्हा



**सोलापूर :** दुसरे लग्न करण्याची धमकी देऊन 15 लाखांची मागणी केल्याप्रकरणी सासरच्या पाच जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आरती तेजपाल सोनवणे (वय 24 राहणार मड्डी वस्ती, जुना तुळजापूर नाका, सोलापूर ) यांनी फिर्याद दिली आहे. याप्रकरणी पती अक्षय सोनवणे, सासू रमा सोनवणे, दीर संग्राम सोनवणे, चुलत दीर राजू सोनवणे, चुलत नणंद शितल सोनवणे (सर्व राहणार तरडगाव, तालुका इंदापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा तपास पोलीस हवालदार रुपनर हे करीत आहेत.

### चार दिवसापासून सोलापूरात वानराचा धुमाकूळ

**सोलापूर :** सोलापूरच्या कुमठा नाका परिसरातील म्हेत्रे वस्तीच्या पाठीमागील सोलगी नगर मध्ये मागील चार दिवसांपासून वानरांनी हैदोस घातला आहे. तीन वानर असून ते चार दिवस झाले याच नगरातील या घरावरून त्या घरावर उड्या मारत आहेत.

## वंचित बहुजन आघाडी चे जिल्ह्यात उमेदवार उभा करण्याच्या हालचाली; आंबेडकरांच्या निर्णयाकडे लक्ष

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** आगामी विधानसभा निवडणुकीकडे वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी लक्ष केंद्रित केले असून त्यांनी निवडणुकीसाठी ११ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. यामुळे आता आंबेडकर यांनी सोलापूर जिल्ह्याकडे लक्ष केंद्रित करण्याच्या हालचाली सुरू केल्या आहेत. सोलापूर जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघात कोणाला उमेदवारी मिळणार याकडे लक्ष लागले आहे .

सोलापूर जिल्ह्यात वंचित बहुजन आघाडीची ताकद चांगली आहे. लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने उमेदवार उभा केला होता. मागील लोकसभा निवडणुक ॲड.



प्रकाश आंबेडकर यांनी लढविली होती. यावेळी त्यांना चांगली मते मिळाली होती. यामुळे आता पुन्हा आंबेडकर यांनी आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून सोलापूर जिल्ह्याकडे लक्ष केंद्रित केले आहे. यामुळे जिल्ह्यात असलेल्या ११ विधानसभा मतदार संघात कोणा कोणाला संधी मिळणार याकडे लक्ष लागले आहे. सोलापूर जिल्ह्यातील नेत्यांनी आगामी विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटांकडून उमेदवारी मिळावी म्हणून जिल्ह्यातील अनेक इच्छुक नेते शरद पवार यांच्या भेटीला जात आहेत तर काहीजण महायुतीच्या संपर्कात असल्याचे समजते. पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात इच्छुक उमेदवारांची संख्या वाढत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघात वंचित कडून उमेदवार उभा राहिल्यास अटीतटीची निवडणूक होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी ११ मतदार संघात उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. यामुळे काही दिवसातच सोलापूर जिल्ह्यातील उमेदवारांची यादी जाहीर होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.



## विद्यार्थ्यास मारहाण; शिक्षकाविरुद्ध गुन्हा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**करमाळा :** अभ्यासाच्या कारणावरून विद्यार्थ्याला मारहाण करणे एका शिक्षकाला चांगलेच अंगलट आले आहे. याप्रकरणी संबंधित मुलाच्या पालकाने दिलेल्या फिर्यादीवरून शिक्षकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धनंजय मच्छिंद्र नागणे (राहणार केम ) असे या शिक्षकाचे नाव आहे. ते करमाळा तालुक्यातील एका शाळेत शिक्षक असून त्यांनी एका अल्पवयीन मुलाला वर्गात मारहाण करून जखमी केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध मुलाच्या वडिलांनी करमाळा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

## वातावरणातील बदलामुळे पिकावर किडीचा प्रादुर्भाव; शेतकरी चिंताग्रस्त

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** सध्या पावसाळा असला तरी गेल्या आठ दिवसापासून वातावरणात सतत बदल होत आहे. पहाटे गार वारा, दुपारी कडक ऊन व संध्याकाळी पाऊस पडत आहे. वातावरणातील सततच्या बदलामुळे पिकावर किडीचा प्रादुर्भाव होत असल्याने शेतकऱ्यातून चिंता व्यक्त होत आहे.



यंदा जून महिन्यापासून चांगला पाऊस पडला आहे. यामुळे मका, ज्वारी, सोयाबीन, गहू, उडीद, भुईमूग, तुर आदी पिके जोमाने आली आहेत. यामुळे शेतकरी वर्ग आनंदात असतानाच गेल्या पंधरा दिवसापासून वातावरणात सतत बदल होत आहे. यामुळे पिकांवर किडीचा प्रादुर्भाव होत असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. बाजारात कीटकनाशकाच्या किंमती जास्त असल्याने त्या खरेदी करणे शेतकऱ्यांना परवडत नाही. शनिवारी पंढरपुर शहर व तालुक्यात दमदार पाऊस झाला. यानंतर दुपारी पुन्हा कडक ऊन पडले तर रविवारी दिवसभर ढगाळ वातावरण असल्याने सूर्यनारायणाचे दर्शन झाले नाही. वातावरणात सतत बदल होत असल्याने पिकावर परिणाम होत असून उत्पादन घटणार असल्याने शेतकऱ्यातून चिंता व्यक्त होत आहे.

## हायवा ट्रक व दुचाकीच्या अपघातात तरुणाचा मृत्यू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**सोलापूर :** चुकीच्या दिशेने भरधाव वेगात आलेल्या हायवा ट्रकने मोटार सायकलस्वारास जोराची धडक दिली. या धडकेत 28 वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे. बरगली शिवानंद बन्ने (वय 28 )असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. हा अपघात कुंभारी गावाजवळ 20 सप्टेंबर रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडला. याप्रकरणी अंबादास बरगली बन्ने यांनी दिलेला फिर्यादीवरून सिद्धाराम भीमाशंकर कोळी (वय 36, राहणार माळीनगर, सोलापूर )याच्या विरोधात वळसंग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अपघाताचा पुढील तपास हेड कॉन्स्टेबल कुवर हे करीत आहेत.

## २७५० शेतकऱ्यांना मिळणार २ कोटी ६० लाख रुपये नुकसान भरपाई

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** सोलापूर जिल्ह्यात एप्रिल व मे महिन्यात अतिवृष्टी झाली होती. यामुळे शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. याचे पंचनामे महसूल व कृषी विभागाने करून शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता. त्यानुसार पंढरपूर तालुक्यातील २७५० शेतकऱ्यांना २ कोटी ६० लाख रुपये नुकसान भरपाई मिळणार आहे. ऐन सणासुदीच्या अगोदर नुकसान भरपाई मिळणार असल्याने शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे. सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात पिकांची पेरणी केली होती. पिके जोमाने आली असताना एप्रिल मे महिन्यात अतिवृष्टी झाली. यामुळे शेतातील पिकांचे नुकसान झाले. म्हणून शेतकऱ्यांनी नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शासनाकडे केली. याची दखल घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस व मुख्यमंत्री अजित पवार यांनी महसूल व कृषी विभागाला शेतातील पिकांचे पंचनामे करण्याचे आदेश दिले. त्यानुसार सोलापूर जिल्ह्यात पंचनामे करण्यात आले. या पंचनामांमध्ये १५ हजार ४५० शेतकऱ्यांच्या शेतातील १० हजार हेक्टर वरील पिकांचे सुमारे ३७ कोटी ४० लाख रुपयाचे नुकसान झाले असल्याचा अहवाल शासनाला देण्यात आला. या अहवालानंतर शासनाने ही रक्कम मंजूर केली आहे. त्यानुसार पंढरपूर तालुक्यातील २७५० शेतकऱ्यांना २ कोटी ६० लाख रुपयाची नुकसान भरपाई मिळणार आहे. पुढील महिन्यात दसरा दिवाळी सण असल्यामुळे शेतकऱ्यांना या रकमेचा उपयोग होणार आहे. अधिकाऱ्यांनी ताबडतोब याद्या तयार करून शेतकऱ्यांच्या बँक खात्यामध्ये रक्कम जमा करावी असे आदेश शासनाने दिले आहेत. त्यानुसार अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना बँक खाते आधार प्रमाणीकरण करून नंबर देण्याचे आवाहन केले आहे.

## नेमतवाडीच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माढा :** माढा नगरपंचायतच्या नगराध्यक्षा मीनल साठे यांनी नेमतवाडी येथे गाव भेट दौऱ्याच्या निमित्ताने भेट दिली. यावेळी त्यांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या आणि अडचणी जाणून घेतल्या. या दौऱ्यात अपूर्ण विकासकामांवर चर्चा करत, गावाच्या प्रगतीसाठी आवश्यक त्या उपाययोजना लवकरात लवकर राबवण्याचे आश्वासन दिले. पायाभूत सुविधा, आरोग्य, शिक्षण आणि महिलांसाठीच्या योजनांवर विशेष लक्ष देत, नेमतवाडीच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. सध्या त्यांनी विधानसभेच्या दृष्टीने काम करण्यास सुरुवात केली आहे.

## पुरस्कार....

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती पंढरपूरचे सह अध्यक्ष तथा अध्यक्ष नाथ संस्थान औसा चे गहिनीनाथ महाराज औसेकर यांना आफ्टरनुन व्हाईस, मुंबई या संस्थेमार्फत महाराष्ट्र रत्न 2024 पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. दि. 21 सप्टेंबर रोजी राज्याचे शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांच्या हस्ते व सिनेअभिनेत्री सोनाली कुलकर्णी व आफ्टरनुन व्हाईस, मुंबईच्या संस्थापक अध्यक्षा डॉ.वैदही ताम्हण यांच्या प्रमुख उपस्थित यशवंतराव चव्हाण सभागृह, नरिमन पॉईट मुंबई येथे सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

## केंद्र व राज्य शासनाने जातीभेद न मानता

# आर्थिक निकषावर आरक्षण द्यावे - अमित ठाकरे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** केंद्र व राज्य शासनाने जातीभेद न मानता गोरगरीब नागरिकांना आर्थिक निकषावर आरक्षण द्यावे असे मनसे विद्यार्थी संघटनेचे नेते अमित ठाकरे यांनी सांगितले.

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदार संघातील मनसेचे उमेदवार दिलीप धोत्रे यांनी मंगळवेढा येथे राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले आहे. याचे उद्घाटन करण्यासाठी अमित ठाकरे आले असता पंढरपूर येथे पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी उमेदवार दिलीप धोत्रे व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी पत्रकारांनी अमित ठाकरे यांना सध्या राज्यात मराठा धनगर समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी आंदोलन सुरू आहे. आरक्षणाविषयी आपली भूमिका काय ? असे विचारले असता अमित ठाकरे म्हणाले, देशात गोरगरीब नागरिकांची संख्या भरपूर आहे. तरी केंद्र व राज्य शासनाने जातिभेद न मानता आर्थिक निकषावर आरक्षण द्यावे. वरळी विधानसभा मतदार संघातून आपण शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांच्या विरुद्ध निवडणूक लढविणार असल्याची



चर्चा आहे. याबाबत विचारले असता अमित ठाकरे म्हणाले, वरळी नव्हे तर साहेब आदेश देतील त्या मतदार संघात मी निवडणूक लढविण्यास तयार आहे. राज्यात महिला वरील अत्याचार वाढले आहेत. यामुळे नागरिकात नाराजी पसरली आहे. पोलिसांवर राजकीय नेत्यांचा दबाव असल्यामुळे काम करण्यास पोलिसांना अडचण येत आहे. राज्यात मनसेची सत्ता आल्यास पहिल्यांदा पोलिसांना स्वायत्तता देण्यात येईल असे त्यांनी सांगितले . आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात तिसरी आघाडी स्थापन करायच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. त्यांच्याकडून आपणास सहभागी होण्याचा प्रस्ताव आल्यास मनसे तिसऱ्या आघाडीत सहभागी होणार का असे पत्रकार आणि विचारले असता अमित ठाकरे म्हणाले याबाबतचा निर्णय साहेब राज ठाकरे घेतील.

## राष्ट्रवादीच्या प्रदेश प्रवक्तेपदी शरद गोरे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**माढा :** माढा तालुक्यातील उपळाई बुद्रुक येथील अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद गोरे यांची राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेश प्रवक्ते पदी निवड करण्यात आली आहे. त्यांना निवडीचे पत्र प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या हस्ते देण्यात आले. गोरे यांनी साहित्य विश्वात केलेल्या कार्याची दखल घेऊन पक्षाची संघटनात्मक बांधणी, पक्ष मजबूत करण्यासाठी व तळागाळातील लोकांपर्यंत पक्षाची ध्येय धोरणे व विकास कामे पोहोचवण्यासाठी पक्षाकडून त्यांना संधी देण्यात आली आहे.

## टिपरच्या धडकेत मोटारसायकलस्वार ठार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मंगळवेढा :** भरधाव वेगात अवैध मुरूम टिपरमध्ये घेऊन निघालेल्या टिपर चालकाने मोटर सायकल स्वारास समोरून जोराची धडक दिल्याने एका युवकाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना आज दुपारी 2.30 च्या सुमारास पाठखळ-नंदेश्वर रोडवर घडली आहे. युवराज चंद्रकांत भंडारे ( वय 40 हुन्नूर ता.मंगळवेढा) असे मयत झालेल्या युवकाचे नाव असून अवैध मुरूम वाहत असलेल्या टिपरचा चालक व मालकाचा पोलीस शोध घेत आहेत.

याबाबत प्रथम दर्शीनी दिलेल्या माहितीनुसार, हजापूर येथील फॉरेस्ट मध्ये अवैध मुरूम उत्खनन सुरू असून तेथून हा टिपर चोरीचा मुरूम भरून मंगळवेढयाकडे येत असताना नंदेश्वर-पाठखळ रोडवर आला असता पाठखळ येथून नंदेश्वरच्या दिशेने निघालेल्या मोटारसायकलस्वारास टिपरने समोरून जोराची धकड दिली. यात मोटारसायकलस्वार भंडारे याचा जागीच मृत्यू झाला असून टिपर पलटी होऊन टिपरमध्ये असलेला अवैध मुरूम रस्त्यावर पडलेला आहे. याबाबत पोलीस हवालदार तुकाराम कोळी यांनी सदर घटनेचा पंचनामा केला असून गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, गेले अनेक दिवस हाजापूर येथील फॉरेस्ट येथून अवैध मुरूम वाहतूक सुरू असून याबाबत कोणीच आजपर्यंत कारवाई केली नाही. संबंधित प्रशासनाने यावरती कडक कारवाई करावी अशी मागणी आता पुढे येऊ लागली आहे.

**सोलापूर :** पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद सोलापूर यांच्या कडील सन 2024-2025 या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा परिषद उपकर योजना व जिल्हा वार्षिक योजनेमधून वैयक्तीक लाभाच्या विविध योजनेतील वैयक्तीक लाभाच्या योजना राबविण्यात येतात. यासाठी पात्र लाभार्थींनी 22 ऑक्टोंबर 2024 पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर यांनी केले आहे.

### रत्नत्रय पतसंस्थेची 20 वी वार्षिक सभा खेळीमेळीत

# रत्नत्रय पतसंस्था देणार सभासदांना 13 टक्के लाभांश : अनंतलाल दोशी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** सदाशिवनगर येथील रत्नत्रय पतसंस्थेची वाटचाल चांगल्या पद्धतीने चालू असून चालू वर्षी संस्थेने सभासदांना 13% लाभांश देण्यात येणार असल्याचे पतसंस्थेचे संस्थापक मा. श्री आनंतलाल (दादा) दोशी यांनी संस्थेच्या 20 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना सांगितले ते कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी होते यावेळी संस्थेचे चेअरमन मा.श्री.विरकुमार दोशी, व्हा. चेअरमन डॉ.श्री. निवास गांधी, संचालक , प्रमोद दोशी,अजय गांधी, रामदास गोपने,जगदीश राजमाने, सोमनाथ राऊत, विलास साळुंखे , सौ.अनिता दोशी व सचिव ज्ञानेश राऊत यांचे सह सर्व सभासद उपस्थित होते

कार्यक्रमाची सुरुवात सभासदांच्या हस्ते भगवान महावीरांच्या व तालुक्याचे भाग्यविधाते सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील व राजमाता रत्नप्रभादेवी मोहिते पाटील यांच्या प्रतिमेचे



पूजन करून व दीप प्रज्वलन करून करण्यात आली पुढे बोलताना दोशी म्हणाले की या पतसंस्थेची स्थापना परिसरातील छोटे व्यवसायिकांना सुलभ रीतीने कर्ज मिळावे त्याची उन्नती व्हावी या उद्देशाने करण्यात आली असून या संस्थेच्या प्रगतीस सर्व सभासद ठेवेदार संचालक व कर्मचारी वर्ग यांचा मोठा सहभाग असून ही पतसंस्था सगळ्यांना चांगली सेवा देत आहे आर्थिक व्यवहाराबरोबरच ही संस्था अनेक सामाजिक कार्य ही करत आहे.

सभेचे प्रास्ताविक संस्थेची कर्तव्यदक्ष संचालक प्रमोद दोशी यांनी केले संस्थेची स्थापना 2004 झाली असून संस्थेमार्फत सभासदांसाठी भारतात कुठेही आरटीजीएस व एनएफटी ची सोय करण्यात आलेले आहे डी डी काढण्याची सोय लाईट बिल भरण्याची सेय क्यू आर कोड पेमेंट सोय , पिग्मी व आर डी तसेच लखपती मासिक ठेव अशा विविध सेवा चालू केलेले आहेत तसेच सर्व कर्जदारांची पिग्मी ची रक्कम दर महिना अखेर ला कर्ज खात्यामध्ये जमा करण्याची सोय अशा विविध सेवा संस्थेमार्फत सभासदांना देण्यात येत आहेत असे त्यांनी सांगितले.

वार्षिक सभेचा अहवाल वाचन संस्थेचे चेअरमन मा.श्री. विरकुमार दोशी यांनी केले त्यांनी संस्थेच्या प्रगतीचा आलेख सभासदांनदाखवला 31 मार्च 2024 अखेर संस्थेकडे 22 कोटींच्या ठेवी असून कर्जवाटप 18 कोटी रुपये आहे तसेच संस्थेचे गुंतवणूक 8 कोटी 48 लाख रुपये इतकी आहे संस्थेचे एकूण वसूल भांडवल 44 लाख 23 हजार रुपये इतके आहे तसेच संस्थेचे एकूण उत्पन्न 2 कोटी 45 लाख रुपये असून खर्च 2 कोटी 16 लाख रुपये झाला असून वार्षिक उलाढाल 137 कोटी 21 लाखा रु इतकी आहे संस्थेला चालू वर्षी 29 लाख 22 हजार रुपये नफा झाला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले संस्थेला या वर्षी ऑडिट वर्ग "अ" मिळाला असून सर्व सभासदांना संस्था 13% लाभांश देणार असल्याचेही त्यांनी सांगितले. संस्थेचे सभासद श्री . भगवान शिंदे व ॲड. शिवाजी मदने यांनीही आपले मनोगत व्यक्त केले व संस्था सभासदांना देत असलेल्या सेवे बद्दल कौतुक केले तसेच सभासदांना 13% लाभांश दिल्याबद्दल आभार मानले. सभेपुढील विषय वाचन संस्थेचे सचिव ज्ञानेश राऊत यांनी केले संस्थेचे तेरीज ताळेबंद नफा तोटा व अंदाजपत्रक यावेळी त्यांनी सभासदांसमोर वाचून दाखवले तसेच एक ते आठ या विषयावर सर्वानुमते मंजुरी देण्यात आली सर्व सभा आनंदी व खेळीमेळी च्या वातावरणात पार पडली.सालाबाद प्रमाणे याही वर्षी वेळेवर येणाऱ्या सभासदांना लकी ड्रॉ द्वारे बक्षिसे काढण्यात आली.

यामध्ये प्रथम क्रमांक श्री . मुकुंद कापसे द्वितीय क्रमांक श्री. सतीश गांधी व तृतीय क्रमांक श्री. सुरेश धाईजे यांना अनुक्रमेबक्षिसे लागली तसेच सर्व हजर सभासदांना स्वादिष्ट भोजनाची सोय यावर्षी संस्थेमार्फत करण्यात आले होते यावेळी मोठ्या संख्येने सभासद व पत्रकार बंधू उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिव ज्ञानेश राऊत यांनी केले तर आभार प्रदर्शन जगदीश राजमाने यांनीनले सदर कार्यक्रम पार पाडण्यासाठी संस्थेचे कर्मचारी व पिग्मी एजंट यांनी परिश्रम घेतले

## मोहोळमध्ये अजितदादांच्या राष्ट्रवादीत दुफळी



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** राज्यात उपमुख्यमंत्री अजित पवारांनी शरद पवारांची साथ सोडत वेगळी भूमिका घेतली. मात्र, सोलापुरातील प्रस्थापित नेते शरद पवारांसोबत न जाता अजित पवार यांच्यासोबत राहिले. दरम्यान, राष्ट्रवादीत फुट पडलेली असली तरीही मोहोळ तालुक्यातील कट्टर विरोधक असलेले माजी आमदार राजन पाटील आणि प्रवक्ते उमेश पाटील अजित पवारांच्या राष्ट्रवादीत आहेत. दोघांमध्ये सातत्याने एकमेकांविरोधात कुरघोड्याही करण्यात येतात. आता उमेश पाटलांनी 'दादा आपसे बैर नही, राजन तेरी खैर नही', अशी घोषणाच केली आहे.

» Selected

## सोलापुरात शिवसेना काँग्रेसमध्येच जुंपली ...!



**सोलापूर :** सकल मराठा समाजाचे समन्वयक माऊली पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यक्रम उधळून लावण्याचा इशारा दिला होता. त्यावर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी माऊली पवार यांच्यावर सुपारी बाज असा आरोप केला. नकळत त्यांनी काँग्रेस पक्षाच्या नेत्यांवर ही टीका केली. अमोल शिंदे यांच्या टीकेनंतर काँग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक विनोद भोसले यांनी अमोल शिंदे यांना फैलावर घेतले आहे.

## विधानसभेच्या तयारीला वेग, निवडणूक आयोगाचा दौरा; लवकरच आचारसंहिता



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** राज्यातील विधानसभा निवडणुकीची घोषणा लवकरच होण्याची शक्यता आहे. राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या तयारीची पाहणी आणि आढावा घेण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोग महाराष्ट्राच्या दौरा करणार आहे. येत्या 27 आणि 28 सप्टेंबर रोजी आयोगाचा मुंबई दौरा आयोजित करण्यात आलाय. निवडणुक आयोगाच्या बैठकीनंतर विधानसभा निवडणुकीसाठी ग्रीन सिग्नल मिळणार असल्याची माहिती आहे. ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे

## सत्कार....

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**सांगोला :** सांगोला शहरातील नामदेव शिंपी समाजाचा बऱ्याच दिवसापासून प्रलंबित असलेला समाज मंदिरासाठीचा प्रश्न आमदार शहाजीबापू पाटील यांनी मार्गी लावत समाजमंदिरासाठी ५० लाख रुपये निधी मंजूर केला. त्यानिमित्त समस्त शिंपी समाज बांधवांकडून आमदार शहाजीबापू पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

## निवडणुकीनंतर नितेश राणे तुझे बडबड बंद करणार



**सोलापूर :** मोहम्मद पैगंबर यांच्या बद्दल वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या रामगिरी महाराज यांच्या निषेधार्थ एम आय एम पक्षाच्या वतीने मुंबईत 23 सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. यासंदर्भात एम आय एमचे सोलापूर मध्येचे उमेदवार फारूक शाब्दिक यांनी नितेश राणे वर टीकाही केली आहे. दरम्यान नितीश राणे यांच्या बद्दल बोलताना या विधानसभा निवडणुकीनंतर एमआयएम त्याचे बडबडणे बंद करेल असा इशारा देताना देवेंद्र फडणवीस यांना हे आवाहन केले.

## डिसले गुरुजी अमेरिकेत; पत्नी कोर्टात.. गुरुजींवर गंभीर आरोप



**बार्शी :** ग्लोबल टीचर रणजितसिंह डिसले गुरुजी पुन्हा एकदा चर्चेत आहेत. त्यांच्या पत्नीनेच गुरुजींविरोधात लातूरच्या प्रथम वर्ग न्यायादंडाधिकाऱ्यांकडे कौटुंबिक हिंसाचाराची तक्रार दिली आहे. न्यायालयाने डिसले गुरुजींसह चौघांना नोटीस बजावली आहे. गर्भवती असताना बेल्टने मारले, सोन्याच्या दागिन्यांसाठी छळ केला, आदी कौटुंबिक अत्याचाराचे अनेक आरोप डिसले गुरुजींवर त्यांच्या पत्नीने केले आहेत. तर, डिसले गुरुजी हे 9 महिने रजेवर असून, ते अमेरिकेत असल्याने याबाबत काही माहिती नसल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले.

## खोटा मेसेज दाखवून अकरा लाखांना फसविले




**सोलापूर :** टिपर खरेदी करून बँकेतून आरटीजीएस खरेदी केल्याचा खोटा मेसेज दाखवून 11 लाख 30 हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दोघांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी आकाश तुकाराम सारोळकर (वय 31 राहणार संतोष नगर, बाळे )यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोपट दत्तात्रय इंगळे व किशोर राजे गाडे (राहणार जाधव वस्ती, वाफेगाव, तालुका माळशिरस) या दोघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला आहे. हा प्रकार 11 ते 15 एप्रिल 2024 दरम्यान घडला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार चुंगे हे करीत आहेत.

## बेपत्ता असलेल्या व्यक्तीचा मृतदेह आढळला दगडाच्या खाणीत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**मोहोळ :** मागील आठ दिवसांपासून बेपत्ता असलेल्या पाटकुल व्यक्तीचा मृतदेह दगडाच्या खाणीमध्ये सापडला. हा मृतदेह सारोळे पाटीजवळ खडीक्रेशर च्या दगडाच्या खाणीत साठलेल्या पाण्यात शनिवारी (दि. २१) आढळून आला. गणेश रामकृष्ण मुसमुसे असे मृत व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी मोहोळ पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. याप्रकरणी मोहोळ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून अधिक तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल विजय गोरे करीत आहेत.









## श्रीराम महिला बी.एस्सी मध्ये 'संशोधन पेपर लेखनासाठी अभिनव साधनांचा वापर' या विषयावर राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** श्रीराम महिला विज्ञान महाविद्यालय, माळशिरस येथे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि रसायनशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'संशोधन पेपर लेखनासाठी अभिनव साधनांचा वापर' या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेमध्ये प्रमुख मार्गदर्शक म्हणून पुण्यातील 'डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी-वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी' चे डॉ. प्रा. विकास मगर उपस्थित होते. त्यांनी संशोधन पेपर लेखन अधिक प्रभावीपणे करण्यासाठी आधुनिक साधनांचा वापर कसा करावा, तसेच दर्जेदार शोधनिबंध तयार करण्याच्या कौशल्यांवर मार्गदर्शन केले.



कार्यशाळेमध्ये संशोधन पेपर लेखनाची प्रक्रिया, ऑनलाइन साधनांचा वापर, तांत्रिक आणि सर्जनशील लेखन कौशल्ये, साहित्य समीक्षा आणि संदर्भ व्यवस्थापन साधने, तसेच संशोधन डेटा विश्लेषण साधनांचा वापर यासारख्या महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर विद्यार्थिनींना प्रशिक्षण देण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले. संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रकाश पाटील, मार्गदर्शक श्रीलेखा पाटील, सचिव अभिषेक पाटील, आणि उपाध्यक्ष करण पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले.

या कार्यक्रमाला संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी श्री. विनोद बाबर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुसूदन बचुटे, आणि महाविद्यालयातील शिक्षक तसेच विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रा. अश्विनी भोई यांनी केले.

## कोल्हापूर -कलबुर्गी- कोल्हापूर इंटरसिटी रेल्वे सुरू करा

# रेल्वे मागण्यांचा सकारात्मक प्रस्ताव रेल्वे बोर्डस पाठविणार :- मच्छिंद्र गळवे

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**सांगोला :** शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने पुणे विभागाचे वरिष्ठ मंडल कार्मिक अधिकारी मच्छिंद्र गळवे यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

प्रामुख्याने कोल्हापुरातून सोलापूरला जाण्याकरता सकाळच्या 7-8 या वेळेत रेल्वे सेवा सुरू केल्यास मिरज, सलगरे, कवठेमंकाळ, ढालगाव सांगोला येथील नागरिकांना पंढरपूर, सोलापूर, अक्कलकोट, गाणगापूर या ठिकाणी जाण्याकरिता रेल्वे सुरू करावी यामुळे या भागातील लोकांना कार्यालयीन वेळेत सोलापूर व धार्मिक स्थळी भेटी देऊन परतीच्या प्रवासाकरता सायंकाळी 5 वाजता कलबुर्गी येथून कलबुर्गी ते कोल्हापूर अशी रेल्वे सेवा सुरू करावी, कोल्हापूर - सोलापूर -हैदराबाद रेल्वे सेवा सुरू करावी,कोल्हापूर ते कलकत्ता, कोल्हापूर -पंढरपूर -तिरुपती रेल्वे सुरू करावी. कुर्डूवाडी- मिरज रेल्वेचा विस्तार कोल्हापूर पर्यंत करावा तसेच लातूर मिरज कोल्हापूर या



शहीद अशोक कामटे संघटनेच्या निवेदनातिल मागणीनुसार कोल्हापूर -सोलापूर-कलबुर्गी- कोल्हापूर इंटरसिटी, कोल्हापूर- हैदराबाद रेल्वेचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास पाठवून पाठपुरावा करणार आहे प्रामुख्याने या मानदेशातील संघटना ,प्रवासी यांच्या सूचना व मागण्या करिता सकारात्मक अहवाल वरिष्ठ कार्यालयास पाठवून गैरसोय दूर करण्याचा प्रयत्न करून प्रवासी रेल्वेसेवा वाढवण्यावर भर देणार आहे.

**मच्छिंद्र गळवे,** विभागीय अधिकारी
भारतीय रेल्वे कार्मिक सेवा, भारत सरकार

मार्गावरील पुणे अंतर्गत येणारे रेल्वे दुहेरीकरणाचे काम ही तात्काळ सुरू करावे. दुहेरीकरणापर्यंत मिरज ते कुर्डूवाडी मार्गावरील क्रॉसिंग पॉइंट वाढवावेत प्रामुख्याने कोल्हापूर, मिरज हे पुणे विभागात येत असल्याने या विभागातील खासदार, वरिष्ठ अधिकारी मागणी केली आहे.या निवेदनाच्या प्रती रेल्वेमंत्री, महाव्यवस्थापक, सोलापूर, पुणे विभागातील सर्व खासदारांनाही देण्यात आल्या आहेत.

यावेळी अशोक कामटे संघटनेचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

**सोलापूर :** मोटारसायकलवरील वृद्धास धडक देऊन मृत्यूस कारणीभूत ठरल्याबद्दल डंपर चालक फरीद नशीर शेख (वय 35, रा. उळेवाडी, तालुका उत्तर सोलापूर) याच्या विरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. 20 सप्टेंबर रोजी दुपारी तीन वाजून दहा मिनिटांच्या सुमारास सात रस्ता येथील एका हॉस्पिटल समोर डंपरने धडक दिल्याने मोटार सायकलवरील बाळासाहेब विश्वनाथराव कुलकर्णी( वय 81 रा. गणेश नगर, योगक्षेम सोसायटी )यांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी गणेश बाळासाहेब कुलकर्णी (वय 45, रा. जेऊर तालुका अक्कलकोट ) यांनी फिर्याद दिली आहे.

## स्वेरी फार्मसीमध्ये दोन दिवसीय इंडस्ट्री एक्स्पर्ट लेक्चर सिरीज संपन्न

## 'फार्मा इंडस्ट्री' आणि 'टॅबलेट कोटिंग' मधील नवीन तंत्रज्ञान आणि संशोधन यावर मार्गदर्शन

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

**पंढरपूर :** ' गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचालित, कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये दि.०८ सप्टेंबर ते दि.०९ सप्टेंबर २०२४ या दोन दिवसात फार्मसी क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते. या सत्रात प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून 'अॅक्वा ड्राय फार्मा प्रायव्हेट लिमिटेड.' (जि.ठाणे) या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक लक्ष्मीकांत सदाफुले हे उपस्थित होते.

स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ.बी. पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार यांच्या नेतृत्वाखाली या मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्राला प्रमुख अतिथी म्हणून अॅक्वा ड्राय फार्मा प्रायव्हेट लिमिटेड.' या कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक लक्ष्मीकांत सदाफुले हे होते. दीपप्रज्वलनानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. डॉ.मणियार यांनी प्रास्तविकात कॉलेज बद्दल माहिती सांगताना म्हणाले की, 'भारत हा जगाचा 'फार्मसी हब' म्हणून ओळखला जाणारा देश आहे. भारतामध्ये फार्मसीच्या क्षेत्रात नवनवीन संशोधने सुरु असतात. त्यामध्ये औषधे तयार करताना वापरल्या जाणाऱ्या विविध तंत्रज्ञानाचा समावेश आहे. त्यातीलच एक 'टॅबलेट कोटिंग' म्हणून ओळखली जाणारी महत्वाची प्रक्रिया सध्या 'फार्मा इंडस्ट्री'मध्ये महत्वाची असून ती अनिवार्य आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी या क्षेत्राकडे उत्तम करिअरचा एक पर्याय म्हणून पाहण्यास हरकत नाही. दिवसेंदिवस फार्मसीचे महत्व वाढत असून ते लोकांना जाणवत देखील आहे, 'टॅबलेट कोटिंग इंडस्ट्री' मध्ये सध्या असणाऱ्या मागणीमुळे विद्यार्थ्यांना नोकरी किंवा व्यवसाय यामध्ये भारत आणि भारताबाहेर खूप संधी उपलब्ध झाल्या



आहेत. त्यामुळे ह्या विषयाचे मार्गदर्शन हे विद्यार्थ्यांसाठी उपयोगी ठरेल.' फार्मसी क्षेत्रातील जवळपास २० वर्षांपेक्षा अधिक अनुभव असलेल्या सदाफुले यांनी 'फार्मा इंडस्ट्री' बद्दलची अद्ययावत माहिती दिली. त्यामध्ये त्यांनी प्रत्यक्षरित्या कंपनीमध्ये कशा पद्धतीचे कामकाज चालते, औषध निर्मितीसाठी कोणकोणती साधने, द्रव्ये वापरली जातात, कोणत्या प्रक्रिया कोणत्या क्रमाने कराव्या लागतात, सध्या फार्मा कंपन्यांची गरज आणि अभ्यासक्रमामध्ये आवश्यक गोष्टी यांबद्दल त्यांनी सविस्तर माहिती दिली. दुसऱ्या दिवशी झालेल्या व्याख्यानामध्ये सदाफुले यांनी 'टॅबलेट कोटिंग' बद्दलची सखोल माहिती विद्यार्थ्यांना दिली. 'टॅबलेट कोटींग' म्हणजे नेमके काय, त्याच्या पद्धती कोणत्या, त्याच्या जुन्या पद्धती व त्यामुळे झालेले तोटे, नवीन पद्धती व त्याचे होणारे फायदे, तसेच नवीन उपकरणे व त्यांचा वापर कशा पद्धतीने करायचा? याबाबत सविस्तर माहिती दिली. त्याचबरोबर 'टॅबलेट कोटिंग' मध्ये चालत असणाऱ्या वेगवेगळ्या प्रक्रिया, काम करताना येणारे अडथळे याचा उत्पादनावर होणारा परिणाम, प्रॉडक्ट्स मध्ये येणाऱ्या त्रुटी व त्या त्रुटी कमी करण्यासाठी वापरली जाणारी प्रक्रिया, या गोष्टींबाबत सखोल माहिती दिली तसेच त्यांनी फोटोज् व व्हिडिओच्या माध्यमातून प्रात्यक्षिक माहिती दिली. पुढे त्यांनी जी. एम. पी., रेगुलेटरी अॅथॉरिटी बद्दल माहिती सांगितली. सदाफुले यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारून त्यांच्याशी मनमोकळेपणाने संवाद साधला तसेच विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरेही दिली. यावेळी विद्यार्थ्यांना करिअर विषयी असणाऱ्या अनेक प्रश्नांनाही समाधानकारक उत्तरे लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. प्रदीप जाधव यांनी केले तर डिप्लोमा फार्मसी विभागाचे प्रमुख डॉ. जितेंद्र कंदले यांनी आभार मानले.

## असंघटित ४०८ कामगारांना मिळणार सदनिका



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**सोलापूर :** राष्ट्रतेज अटल कामगार गृहनिर्माण सहकारी संस्थेतर्फे सोडत सोलापुरातील असंघटित १२०० कामगारांसाठी उभारण्यात येणाऱ्या गृहप्रकल्पातून दुसऱ्या टप्प्यात ४०८ लाभार्थ्यांना सदनिका मिळणार आहेत. त्यासाठी संगणकीय पद्धतीने सोडत काढण्यात आली. हा कार्यक्रम सोलापूर शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी राष्ट्रतेज अटल गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष सुरेश बिराजदार, सचिव अण्णाराव कानडे, माजी नगरसेवक अमर पुदाले, माजी नगरसेविका शालन शिंदे, कल्पना कारभारी, बसवराज इटकळे आदी उपस्थित होते.

Selected

## जनसन्मानातून मतदारसंघासाठी काम करण्याची ऊर्जा मिळते



**पंढरपूर :** येथील विश्वजित गणेशोत्सव तरुण मंडळ व सुनिलराज डोंबे मित्र मंडळातर्फे श्री गुरु बाबासाहेब महाराज आजरेकर फड (मठ), उत्पात गल्ली या ठिकाणी मतदारसंघासाठी केलेले काम व कासेगांव येथे एमआयडीसी मंजुर करून आणल्याबद्दल पंढरपूर - मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी आवताडे म्हणाले अशा जनसन्मानातून मतदारसंघासाठी अधिक सक्षम कार्य करण्याची ऊर्जा मला मिळते. यावेळी गुरुवर्य ह. भ. प. चैतन्य महाराज देगलूरकर, सुनिलराज डोंबे आदी मान्यवर उपस्थित होते.

## कृषि आणि धार्मिक पर्यटनाला चालना मिळावी



**सोलापूर :** लोकमंगल बँक आणि अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने हुतात्मा स्मृती मंदिर, सोलापूर येथे एक लाख मराठा उद्योजक संकल्पपूर्ती निमित्त 'मराठा उद्योजक मेळावा' आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात यशस्वी उद्योजकांचा सत्कार करण्यात आला. तसेच काही उद्योजकांना 15 लाख रुपये कर्जाच्या मंजुरीचे धनादेश वाटप करण्यात आले. यावेळी सोलापूर दक्षिणचे आमदार सुभाष देशमुख यांनी जिल्ह्यात कृषि आणि धार्मिक पर्यटनाला चालना मिळण्याचे आवाहन उपस्थितांना केले.

## मराठा आंदोलकांकडून अजितदादांचा ताफा अडवण्याचा प्रयत्न



■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मोहोळ :** मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ तसेच मराठा आरक्षणाच्या मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी चंद्रमोळी चौक, मोहोळ येथे मराठा समाजाच्या आंदोलकांनी आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा ताफा अडवण्याचा प्रयत्न केला. यावेळी आंदोलनकर्त्यांनी शर्ट काढून जोर जोरात घोषणाबाजी केली. पोलिसांनी आंदोलकांना बाजूला घेतले. दरम्यान अजितदादा जनसन्मान यात्रेसाठी आज मोहोळ येथे आले आहेत. यावेळी हे आंदोलन करण्यात आले.


## भव्य रॅली...

पंढरी संचार छायाचित्र सेवा



**पंढरपूर :** येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालय व यशवंत विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या एकशे सदतीसव्या जयंतीनिमित्त फुलांनी सजविलेल्या रथातून पंढरपूर शहरामधून काढण्यात आली. या रॅलीचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेच्या मनेजिंग कौन्सिलचे सदस्य व माजी सचिव प्रिं. डॉ. जे. जी. जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

## विहिरीत पडून अनोळखी तरुणाचा मृत्यू



**सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी येथील शिवमूर्ती भोरगुंडे यांच्या शेतातील विहिरीत पडून एका अनोळखी तरुणाचा मृत्यू झाला. शनिवारी दुपारी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास विहिरीतील पाण्यावर एक 30 ते 35 वर्षांचा तरुण तरंगताना आढळून आला. ही माहिती वळसंग पोलीस ठाण्यास कळवण्यात आली. पोलीस नाईक आर. डी. बनकर यांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. दोन ते तीन दिवसांपूर्वी हा तरुण या विहिरीत पडला असावा असा अंदाज व्यक्त केला जात आहे. या घटनेची प्राथमिक नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

## श्रीराम महाविद्यालया मध्ये एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन: एक सेल्फी अशी ही

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**माळशिरस :** श्रीराम शिक्षण संस्था संचालित श्रीराम इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, पानिव येथे दिनांक २१ सप्टेंबर 2024 या दिवशी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यशाळेसाठी मार्गदर्शक म्हणून मा.डॉ सौ. रेवती राणे हे लाभले

डॉ सौ.रेवती राणे यांनी "एक सेल्फी अशी ही "या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले.या व्याख्यानाचा मुख्य उद्देश व्यक्तीला स्वतःचे मूल्य ओळखणे, स्वतःचा विकास करणे, आणि आपल्यातील आत्मविश्वास वाढवणे हा होता. त्यांनी व्यक्तिमत्व विकासाच्या वेगवेगळ्या पैलूंवर भर दिला, जसे की स्वतःचे गुण ओळखणे, आपले दोष सुधारणे, आणि आपल्याच जीवनाच्या प्रवासातून प्रेरणा घेणे.



"एक सेल्फी" या संकल्पनेचा अर्थ केवळ स्वतःचा फोटो घेणे नसून, तो एक सकारात्मक आहे ज्याद्वारे आपण आपले अंतरंग पाहू शकतो, स्वतःला नव्याने समजून घेऊ शकतो, आणि आपल्या जीवनातील आव्हानांना सामोरे जाण्याची तयारी करू शकतो. या व्याख्यानातून त्यांनी सांगितले की, स्वतःकडे पाहण्याची कला शिकल्यास जीवनात यशस्वी होण्याचे मार्ग सोपे होतात.या वेळी बोलताना त्या बोलताना म्हणाले कि विद्यार्थ्यांनी प्रत्येक गोष्टीकडे सकारात्मकतेने पाहिचे पाहिजे तसेच सध्याच्या युगामध्ये वावरत असताना विद्यार्थ्यांनी इंटरनेट व सोसिअल मीडिया याचा उपयोग हा चांगल्या दृष्टीकोनासाठी व त्याचा योग्य वापर करावाकराव असे आव्हान त्यांनी केले. या कार्यक्रमातून उपस्थितांना आत्मनिर्भरता,सकारात्मक विचार, आणि जीवनातील समस्यांचा मुकाबला करण्याची प्रेरणा मिळाली. सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी महाविद्यालयाचे संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील मार्गदर्शक श्रीलेखा पाटील संस्थेचे उपाध्यक्ष करण पाटील सचिव अॅड. अभिषेक पाटील, सहसचिव डॉ.समीर पवार व संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी भाऊसो वनवे महाविद्यालयाचे प्राचार्य डावकरे राजेंद्र सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले, सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गणेश पवार आणि आभार प्रा. फारूक तांबोळी यांनी केले.

**सोलापूर :** कडाकरपा या जिवाणूजन्य रोगामुळे रोपे व पाने पिवळी पडून वाळतात. पाने टोकाकडून व कडेने करपत असल्यामुळे याला कडाकरपा असे म्हणतात. तापमान 25 ते 35 अंश सेल्सिअस व आर्द्रता 70 टक्क्यांपेक्षा जास्त या पोषक स्थितीमध्ये रोगाचा प्रादुर्भाव वाढतो. या रोगाचा प्रसार बियाणे, रोगग्रस्त पेंढा, रोगग्रस्त पिकाच्या खाचरातून वाहणारे पाणी यांपासून होतो. रोगग्रस्त शेतातील धसकटे, रानटी भात, गवत, नागरमोथा इ. तणांमुळेही रोगाचा प्रसार होतो.

## येत्या पंधरा दिवसात जाहीर होणार आचारसंहिता?

**सोलापूर :** राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या तारखा कधी जाहीर होणार याकडे सर्वांचं लक्ष लागलेलं आहे. त्यातच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज सोलापुरात बोलताना मोठे वक्तव्य केले आहे. येत्या पंधरा दिवसात आचारसंहिता लागेल असे ते म्हणाले. सोलापुरात 'जन सन्मान यात्रे'दरम्यान बोलत होते. त्यामुळे निवडणूक ही नोव्हेंबर महिन्यातच होण्याचे संकेत मिळत आहेत.






**महाराष्ट्र शासन**
**उपविभागीय अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, करमाळा यांचे कार्यालय**
**ता. करमाळा, जि. सोलापूर पिन- ४१३२०३**

Email Id :- Karmala.de@mahapwd.gov.in — दूरध्वनी क्र. ( ०२१८२) २२०४१४

**दर मागणीपत्र नोटीस**

विषय : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मग्रारोहयो) अंतर्गत उपलब्ध अतिरिक्त कुशल घटकाच्या निधीअंतर्गत घ्यावयाच्या कामांच्या अंमलबजावणीबाबत

संदर्भ : महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रक क्र. मग्रारो-२०२२/प्र.क्र.१३८/रोहयो-७ दि.०६/०४/२०२२ रोजीचे पत्र आणि १) उप सचिव, महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग (रोहयो) पत्र क्र.मग्रारो-२०२४/प्र.क्र.२९/रो.६अ दिनांक २३/०२/२०२४ अन्वये. २) उप सचिव, महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग (रोहयो) पत्र क्र. मग्रारो-२०२४/प्र.क्र.२९/रो-६अ दिनांक २३/०२/२०२४ अन्वये सदरचे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, करमाळा योग्य त्या सक्षम दर पुरवठादारांकडून मुरुम, डब्ल्यु.बी.एम., जी.एस.बी., डी.एल.सी., M-१०, M-२० कॉंक्रीटीकरण व पेव्हींग ब्लॉक बसविण्यासाठी दरपत्रक मागवत आहेत. सदर दरपत्रक बाब क्र. एक ते आठ (१ ते ८) बाबींचे सविस्तर वर्णन सा. बां. उपविभाग, करमाळा या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर/वरिष्ठ लिपीक यांच्याकडून असून, सदर साहित्याचे सिलबंद दरपत्रके दिनांक २४/०९/२०२४ ते ३०/०९/२०२४ दरम्यान कार्यालयीन वेळेत पोहोचतील अशा रीतीने पाठवावीत. उशिरा आलेल्या दरपत्रकांचा स्वीकार केला जाणार नाही. मुदतीत आलेली दरपत्रके दि. ०१/१०/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, करमाळा या कार्यालयात उपलब्ध असलेल्या दरपत्रकारांसमोर उघडण्यांत येतील.

बाब क्र. एक ते आठ (१ ते ८) ची सविस्तर माहिती व वर्णन खालील परिशिष्टामध्ये व तसेच नोटीशीची प्रत सार्वजनिक बांधकाम उपविभाग, करमाळा या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर/वरिष्ठ लिपीक यांच्याकडे उपलब्ध आहेत.

वरील साहित्याचे सदर सर्व करासहित देण्याचे असून वस्तू व सेवा कराची (GST) रक्कम समाविष्ट करु नये. कोणत्याही एक अगर सर्व दर पत्रके मंजूर अथवा कोणत्याही स्थितीत/मंजुरीनंतर देखील नामंजूर करण्याचा हक्क सार्वजनिक बांधकाम उपविभाग, करमाळा या कार्यालयाने राखून ठेवला आहे.

**मग्रारोहयो अंतर्गत सोलापूर जिल्हा करमाळा तालुक्यातील विविध गावांमधील सुरु होणाऱ्या कामासाठी तपशील**

| Sr.No. | Ietm in Brief | Unit | PWD SSR 2022-23 Specification |
|---|---|---|---|
| 1 | Supplying Hard Murum/Kankar at th road site | Cum | It. No. 2.29a, Pg. No. 25 |
| 2 | Compacting Hard Murum side widths | Sqm | It. No. 2.31, Pg. No.25 |
| 3 | Providing and Laying WBM GR-II Type B | Cum | It. No. 3.20 Pg. No.29 |
| 4 | Providing and laying C. C. M. -10 | Cum | It. No. 24.01, Pg. No. 175 |
| 5 | Providing and laying C. C. M. -20 | Cum | It. No. 14.39 Pg. No. 96 |
| 6 | Providing and Fixing C. C. coloured paving blocks 60 mm thick | Sqm | It. No. 33. 51 Pg. No. 218 |
| 7 | Providing and fixing information board. | No | It. No. 6. 47 Pg. No.64 |
| 8 | Providing First and medical kit | No | As Directed by Engineer Incharge |

**नियम व अटी**

१. दर पुरवठा दराने दर पत्रकासोबत सा. बां. विभागाकडे असलेले नोंदणी प्रमाणपत्र, आयकर रिटर्न प्रमाणपत्र, जीएसटी प्रमाणपत्र, सादर करणे बंधनकारक आहे.
२. साहित्य उच्च दर्जाचे व नामांकित कंपनीचे असावे.
३. दर पुरवठा दाराने सदर साहित्य संबंधित कामात ठिकाणी पुरवठा करावयाचे आहे. साहित्याच्या वाहतूकीसाठी वेगळा दर देण्यात येणार नाही.
४. पुरवठादाराने साहित्याचे दर हे वस्तू व सेवा कर वगळून द्यायचे आहेत. वस्तू व सेवा कराची रक्कम देयकात स्वतंत्रपणे देण्यात येईल.
५. दर पुरवठादाराने दर पत्रकासोबत त्याचा VAT/GST क्र. देण्यात यावेत. तथापी VAT/GST क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक असलेल्या दरपत्रक धारकाच्या लेटर हेडवर दरपत्रक देण्यात यावे व तसेच दरपत्रक देताना संबंधिक दरपत्रक धारकाचे पॅन कार्ड देणे बंधनकारक राहील.

जा.क्र. साबांउविक/भांडार/ ८०५ / २०२४
उपविभागीय अभियंता यांचे कार्यालय
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, करमाळा
दिनांक : १३/०९/२०२४
**जिमाका/सो/जाहि/१३५/२०२४-२५**

सही/-
उपविभागीय अभियंता
सार्वजनिक बांधकाम उपविभाग, करमाळा

## वाटपसूत्र ठरले; पण...

महायुतीमध्ये विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपाचा कोणताही तिढा नसून लोकसभा निवडणुकीत ज्याचा स्ट्राइक रेट जास्त होता त्याच पक्षाला जास्त जागा, हे जागावाटपाचे सूत्र असेल आणि जिंकून येण्याची क्षमता हा निकषसुद्धा असेल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केल्यामुळे महायुतीतील जागावाटपाचे सूत्र जरी समोर आले असले, तरी त्यामुळे राजकीय वादविवाद आणि गोंधळ होणे अपरिहार्य मानावे लागेल. कारण एकनाथ शिंदे यांनी ही घोषणा केल्यानंतर अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसनेही तातडीने बैठक घेऊन काही चर्चा केल्याचे समजते. लोकसभा निवडणुकीतील यशाच्या फॉर्म्युल्यावर जर विधानसभा निवडणुकीसाठी जागावाटप करायचे ठरले, तर त्यामध्ये अजित पवार यांना खूपच कमी जागा मिळू शकतात, याची जाणीव अजित पवार यांनाही आहे. कारण लोकसभेमध्ये अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने पाच जागा लढवल्या. त्यापैकी फक्त एक जागा निवडून आली होती आणि त्यांचा स्ट्राइक रेट फक्त २० टक्के होता. भाजपने २८ जागा लढवल्या होत्या आणि त्यांच्या फक्त नऊ जागा निवडून आल्या होत्या, तर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने १५ जागा लढवल्या होत्या आणि त्यांचे सात उमेदवार विजयी झाले होते. साहजिकच स्ट्राइक रेटचा विचार करता सर्वात जास्त स्ट्राइक रेट हा एकनाथ शिंदे यांच्याच पक्षाचा आहे. त्या खालोखाल भाजपचा आणि सर्वात कमी स्ट्राइक रेट हा अजित पवार यांच्या पक्षाचा आहे. अर्थात, हा निकष वापरून विधानसभेतील उमेदवार ठरवता येणार नाही, हे लक्षात आल्यानेच संबंधित उमेदवाराची जिंकून येण्याची क्षमताही तपासली जाणार आहे. विविध प्रकारच्या पक्ष फुटींमुळे स्थानिक पातळीवरील राजकारण ढवळून निघाले आहे ते पाहता उमेदवाराची जिंकून येण्याची क्षमता ठरवणेसुद्धा अवघड जाणार आहे. कारण मुळात एखादा उमेदवार सध्या कोणत्या पक्षाशी निष्ठावान आहे हे ठरवणेसुद्धा अवघड झाले आहे. जेव्हा महाराष्ट्रात महाविकास आघाडी आणि महायुती अशा दोनच आघाड्या समोरासमोर निवडणूक लढवत होते तेव्हा उमेदवारांचा विचार करत असताना कोणतीही अडचण येत नसे. जागावाटप झाल्याप्रमाणे जो तो पक्ष आपल्या उमेदवाराला तिकीट देत असे. पण आता शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन प्रमुख पक्षांमध्ये फूट पडल्याने स्थानिक पातळीवरसुद्धा आपोआपच तेवढ्या प्रमाणात गट निर्माण झाले आहेत. या ठिकाणी जो आमदार गेल्या निवडणुकीत निवडून आला होता त्याला तिकीट द्यायचे ठरवले तर तो आमदार सध्या कोणत्या गटाची बांधिलकी मानत आहे हेसुद्धा लक्षात घ्यावे लागणार आहे. साहजिकच दुसर्या गटाला आपला उमेदवार शोधण्यासाठी पुन्हा एकदा निवडून येण्याची क्षमता तपासून पहावी लागणार आहे. अर्थात, प्रत्यक्ष जागावाटप झाल्यानंतर या गोष्टी समोर येणार आहेत. पण त्यापूर्वीच एकनाथ शिंदे यांनी हा स्ट्राइक रेटचा मुद्दा मांडल्यामुळे २८८ जागांचे वाटप करत असताना स्ट्राइक रेटचे गणित कसे मांडणार हासुद्धा कळीचा मुद्दा ठरणार आहे. २८८ पैकी निम्म्यापेक्षा जास्त म्हणजे दीडशेपेक्षा जास्त जागा लढवण्यावर भाजप ठाम आहे, तर अजित पवार यांनी पूर्वीपासून आम्हाला ८० जागा हव्यात असे म्हटले आहे. एकनाथ शिंदे यांनीसुद्धा आम्हाला १०० पेक्षा जास्त जागांची अपेक्षा आहे, असे सूचित केले आहे. या सर्व अपेक्षांची एकूण बेरीज २८८ या आकड्यामध्ये बसत नसल्यानेच स्ट्राइक रेटच्या आधारे जागावाटपाचे सूत्र ठरवताना अनेक अडचणी निर्माण होणार आहेत. लोकसभा निवडणूक आणि विधानसभा निवडणूक यातील प्रचाराचे विषय आणि प्राधान्यक्रमही वेगवेगळे असल्याने लोकसभा निवडणुकीतील विजयाच्या आधारे विधानसभा निवडणुकीचा उमेदवार ठरवण्याचा निकष कदाचित चुकूही शकतो. एका लोकसभा मतदारसंघामध्ये पाच ते सहा आमदार असल्यामुळे प्रत्येक मतदारसंघाची बांधणी आणि विचारसरणी वेगळ्या प्रकारे असते. जरी एखाद्या मतदारसंघात एका पक्षाचा खासदार निवडून आला तरी त्या मतदारसंघातील सर्व विधानसभा मतदारसंघात त्या खासदाराने विजयी आघाडी घेतली असेल, असे सांगता येत नाही. प्रत्येक पक्षाचा गड आणि बालेकिल्ला ठरला असतो. विधानसभा निवडणुकीत हा गड आणि बालेकिल्ला राखण्याचा जास्त प्रयत्न केला जातो. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीची गणिते अशी वेगळी असल्याने केवळ स्ट्राइक रेट न तपासता लोकसभा निवडणुकीत संबंधित विधानसभा मतदारसंघांमध्ये कोणत्या पक्षाने चांगली कामगिरी केली हे ठरवून त्या आधारे जागावाटप करणे जास्त शास्त्रीय ठरू शकते. अर्थात, याची जाणीव निश्चितच एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार या तिघांनाही आहे. पण तरीही जागावाटप वाटाघाटीमध्ये आपली 'बार्गेनिंग पॉवर' वाढवण्यासाठी राजकीय नेते अशा प्रकारची विधाने करत असतात. महायुतीच्या नेत्यांनी लोकसभा निवडणुकीतील पराभवामुळे निश्चितच धडा घेतला आहे. त्यामुळे फारसे ताणून धरण्याच्या मनस्थितीत आणि परिस्थितीत कोणताही पक्ष नाही. महायुती एकत्र उभी राहिली तरच पुन्हा सत्ता मिळू शकते याची जाणीव सर्व नेत्यांना आहे. त्यामुळे येत्या काही कालावधीमध्ये जागावाटपाचे खरे सूत्र निश्चित होऊन जागावाटप अंतिम केले जाईल; पण विधानसभा निवडणुकीत जर विजय मिळवायचा असेल आणि पुन्हा सत्तेवर यायचे असेल तर उमेदवाराची जिंकून येण्याची क्षमता हा सर्वात महत्त्वाचा निकष असेल. कारण स्ट्राइक रेट हा शब्द क्रिकेटमधून आला आहे आणि क्रिकेटमध्ये कसोटी, एकदिवसीय आणि टी२० सामने या प्रत्येक प्रकारात एकाच खेळाडूचा स्ट्राइक रेट वेगळा असतो. लोकसभा निवडणुकीचा स्ट्राइक रेट विधानसभा निवडणुकीत वापरला तर तो यशस्वी होईलच याची कोणतीही खात्री देता येत नाही.

**पाकिस्तानचे लष्कर प्रमुख जनरल असीम मुनीर यांनी राष्ट्रीय संरक्षण दिवस निमित्त झालेल्या एका कार्यक्रमात सार्वजनिक पातळीवर प्रथमच पाकिस्तानी सैन्याने कारगिर युद्धात सहभाग घेतल्याची कबुली दिली आहे. यापूर्वी पाकिस्तानने केव्हाच कारगिल युद्धात आपला सहभाग असल्याचे मान्य केलेले नव्हते. गेल्या वर्षी नवाझ शरीफ यांनीही कारगिल हल्ला हा पाकिस्तानचाच कट असल्याची कबुली दिली होती. आता मुनीर यांच्या विधानाने पाकिस्तानचे पितळ स्पष्टपणे उघडे पडले आहे. या कबुलीचा फायदा घेत भारताने आता संयुक्त राष्ट्रसंघामध्ये जोरदार आवाज उठवला पाहिजे. तसेच एफएटीएफकडे मागणी करुन पाकिस्तानची आर्थिक मदत रोखली पाहिजे.**

# कारगिलची कबुली; पुढे काय?

ब्रिगेडियर हेमंत महाजन (निवृत्त)

सत्य कधी लपत नाही असे म्हणतात. अत्यंत खोटारडा आणि दुतोंडी देश म्हणून कुख्यात असणाऱ्या पाकिस्तानबाबतही ही गोष्ट खरी ठरली आहे. १९९९ च्या कारगिल युद्धात आपले लष्करी कर्मचारी सहभागी होते हे आता पाकिस्तानने मान्य केले आहे. आजवर कारगिलमध्ये जिहादी आणि मुजाहिद्दीनांचा सहभाग होता आणि त्यात पाकिस्तानी लष्कराचा कोणताही सहभाग नव्हता, अशी पाकिस्तानची जाहीर भूमिका असायची. याच कारणामुळे कारगिल युद्धात मारल्या गेलेल्या आपल्या सैनिकांचे मृतदेहही पाकिस्तानने स्वीकारले नव्हत. त्यावेळी पाकिस्तान त्यांना मुजाहिद्दीन म्हणत होता. पण अखेरीस २५ वर्षांनतर पाकिस्तानी लष्कराचे जनरल असीम मुनीर यांनीच आपल्या पूर्वसुरींचा दावा खोडून काढत देशाचे पितळ उघडे पाडले आहे. संरक्षणदिनाच्या कार्यक्रमात बोलताना मुनीर यांनी यासंदर्भात विधान केलं आहे. १९६५ चं युद्ध असो, १९७१ चं युद्ध असो किंवा १९९९ चं कारगील युद्ध असो, देशासाठी आणि इस्लामसाठी पाकिस्तानी सैनिक शहीद झाले आहेत, असे ते म्हणाले. इतकेच नव्हे तर रावळपिंडी येथे पार पडलेल्या लष्करी समारंभात त्यांनी कारगिलमध्ये मारल्या गेलेल्या पाकिस्तानी सैनिकांना शहीदांचा दर्जा दिला. यापूर्वी २०१० मध्ये देखील पाकिस्तानी लष्कराने आपल्या अधिकृत वेबसाइटवर कारगिल युद्धात शहीद झालेल्या ३५० सैनिकांची नावे पोस्ट केली होती.

पाकिस्तान हा चोरासारखा सत्यापासून दूर पळणारा देश म्हणून ओळखला जातो. कारण १९४७ च्या सप्टेंबर महिन्यात काश्मीरवर हल्ला केला तेव्हाही त्याने फक्त उत्तर-पश्चिम प्रांतातील आदिवासींना मोर्चात पाठवले होते. त्यावेळीही पाकिस्तान लष्कराच्या थेट सहभागापासून दूर पळत राहिला. पण नंतर १९४८ मध्ये जेव्हा त्यांनी काश्मीरवर हल्ला केला तेव्हा १९४९ मध्ये त्यांनी काश्मीरमध्ये आपले सैन्य सक्रिय असल्याचे मान्य केले.

खरे तर पाकिस्तान हा आक्रमक देश आहे. भारतावर चार वेळा आक्रमण करून पाकने युद्ध लादले. पण प्रत्येक वेळी भारताच्या हातून पराभव पत्करावा लागला आणि प्रत्येक वेळी भारतीय लष्कराने त्यांना चारीमुंड्या चित करत अस्मान दाखवले. १९६५ च्या युद्धात तर भारतीय सैन्याने लाहोर गाठले होते. १९७१ च्या युद्धात भारताने पाकिस्तानचे दोन तुकडे करून बांगलादेशची निर्मिती केली होती.

कारगिलमधील मोहिमेला पाकिस्तानने 'ऑपरेशन बद्र' असे म्हटले होते. यामागे पाकिस्तानचे दोन उद्देश्य होते. श्रीनगर, द्रास, कारगिल आणि लेह रस्ता त्यांना कापायचा होता. यामुळे सियाचिनमध्ये भारतीय सैन्याला माघार घ्यावी लागली असती आणि लेह-लडाखच्या भागाकडे भारताला रसद पुरवणे अवघड झाले असते. कारण या भागापर्यंत पोहोचण्याकरता हा एकच रस्ता असून दुसरा पर्यायी मार्ग नाही. त्यामुळे पाकिस्तानला त्यावर कब्जा करणे सोपे झाले असते. या घुसखोरीमागचे आणखी एक कारण म्हणजे, काश्मीरमध्ये जी घुसखोरी आणि दहशतवाद सुरु होता त्या दहशतवादाचे भारतीय सैन्याने जवळपास कंबरडे मोडले होते. काश्मीरमधील सैन्याचे लक्ष विचलित करून त्यांना तेथून बाहेर काढायचे होते. सीमेवर लक्ष केंद्रीत होणयासाठी ज्या भागात भारतीय सैन्य नव्हते तो भाग घुसखोरीसाठी निवडला.पण भारतीय सैन्याने जूनमध्ये सुरु केलेले ऑपरेशन विजय जवळपास साठ दिवस चालवले आणि २६ जुलैला तेथील शेवटच्या पाकिस्तानी सैन्याला यमसदनी पाठवून फतेह मिळवली. पाकिस्तानी सैन्याने घुसखोरी केलेला भाग पुन्हा भारताच्या ताब्यात घेण्यात आला. २६ जुलैला टायगर हिलवर ज्यावेळी भारताचा तिरंगा फडकवला गेला त्यावेळी आपण ही लढाई पूर्णपणे जिंकली. या मोहिमेमध्ये पाकिस्तानच्या जवळपास दहा ते पंधरा हजार सैन्याने भाग घेतला होता आणि भारतीय सैन्याकडून दोन डिव्हजन्स म्हणजे ४० ते ५० हजार जवान ऑपरेशन विजयमध्ये सहभागी झाले होते. या युद्धात आपले जवळपास ३६ अधिकारी आणि ५२७ सैनिक शहीद झाले. अधिकाऱ्यांची रॅन्क होती लेफ्टनंट,कॅप्टन, मेजर, लेफ्टनंट कर्नल. पाकिस्तानच्या या घुसखोरीला उत्तर देण्यासाठी आपल्याला देशातील या बुद्धिमान, साहसी तरुणांची किंमत द्यावी लागली.

२००९ मध्ये पाकिस्तानच्या हवाई दलाचे एअर कमांडर कैसर तुफैल यांनी एक लेख लिहून कारगिल युद्धात पाकिस्तानी सैन्याचा सहभाग असल्याचे सिद्ध केले होते. यामध्ये त्यांनी कारगिल युद्धासाठी पाकिस्तानने केलेल्या तयारीचा पूर्णपणे खुलासा केला होता. जनरल परवेझ मुशर्रफ, चीफ ऑफ जनरल स्टाफ लेफ्टनंट जनरल मोहम्मद अझीझ, एफसीएनए ( फोर्स कमांड नॉर्दर्न एरिया ) कमांडर लेफ्टनंट जनरल जावेद हसन आणि १०-कॉर्प्स कमांडर लेफ्टनंट जनरल महमूद अहमद यांनी देखील कारगिल संघर्षात पाकचा हात असल्याचे म्हटले होते. कारगिल संघर्षकाळात पाकिस्तानचे पंतप्रधान असलेल्या नवाझ शरीफ यांनीही पद सोडल्यानंतर देशाच्या भूमिकेचा स्वीकार केला आहे. शरीफ यांनी पाकिस्तानने १९९९ च्या लाहोर कराराचा भंग केल्याचे म्हटले होते. या करारावर त्यांनी तत्कालिन भारतीय पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या सोबत सह्या केल्या होत्या. कारगिल युद्धादरम्यान लष्करप्रमुख असणारे आणि नंतर राष्ट्राध्यक्ष बनलेले परवेझ मुशर्रफ यांनीही २००६ मध्ये प्रसिद्ध केलेल्या त्यांच्या पुस्तकात कबूल केले होते की कारगिल प्रकरणामुळे ते आणि तत्कालीन पंतप्रधान नवाझ शरीफ यांच्यात तेढ निर्माण झाली होती.

या पार्श्वभूमीवर मुनीर यांच्या ताज्या कबुलीकडे पाहताना एक ठळक फरक लक्षात घ्यावा लागेल. तो म्हणजे आजवर ज्यांनी-ज्यांनी कारगिल युद्धात पाकिस्तानचा हात असल्याची कबुली दिली त्यांना सेवानिवृत्त झाल्यावर उपरती झाली. पण मुनीर हे पहिले असे व्यक्ती आहेत ज्यांनी पदावर असताना तेही लष्करप्रमुखासारख्या पाकिस्तानातील सर्वोच्च पदावर असताना ही कबुली दिली आहे. त्यामुळे भारताने हा मुद्दा आंतरराष्ट्रीय पटलावर प्रकर्षाने मांडला पाहिजे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या अधिवेशनासह सुरक्षा परिषदेतही या कबुलीनाम्याचा आधार घेऊन भारताने आंतरराष्ट्रीय समुदायाला पाकिस्तानविरोधात कारवाई करण्यासाठी बाध्य केले पाहिजे. ही कबुली म्हणजे पाकिस्तान ही दहशतवादाची फॅक्टरी आहे या भारताच्या दाव्याला मिळालेली पुष्टी आहे. त्यामुळे भारताने एफएटीएफ या संघटनेकडेही अपील करुन पाकिस्तानला ब्लॅक लिस्ट करण्याबाबत आवाहन केले पाहिजे. जेव्हा पुराव्यांवरून हे सिद्ध होते की एखाद्या देशाला दहशतवादी वित्तपुरवठा आणि मनी लॉंड्रिंग केले जाते आणि ते त्यांच्यावर नियंत्रण ठेवत नाही, तेव्हा त्याला फायनान्शियल ॲक्शन टास्क फोर्सकडून काळ्या यादीत टाकले जाते.अशा देशांना एफएटीएफ, जागतिक बँक किंवा कोणतीही आर्थिक संस्था आर्थिक मदत देत नाही. रेटिंग एजन्सी नकारात्मक यादीत टाकतात. एकूणच अर्थव्यवस्था विनाशाच्या उंबरठ्यावर पोहोचते. अर्थात पाकिस्तानची अर्थव्यवस्था आधीच संकटांच्या खोल गर्तेत गेल आहे. दिवाळखोर झाली आहे. पण तरीही काश्मीरमध्ये दहशतवाद पसरवून भारताला अस्थिर करण्याची खुमखुमी पाकिस्तानने सोडलेली नाहीये. त्यामुळे भारताने कूटनीतीचा वापर करुन मुनीर यांच्या या कबुलीच्या आधारे पाकिस्तानची कोंडी करण्याची संधी सोडता कामा नये. पाकिस्तानचे राजकीय नेतृत्व सध्या भारतासोबतच्या शांतता चर्चा पुन्हा सुरू करण्यासाठी प्रयत्न करताना दिसत आहे. अशा वेळी लष्करप्रमुखांनी कारगिलबाबतची कबुली देणे याला एक वेगळा अर्थही असू शकतो. तथापि, भारताने पाकिस्तानच्या अंतर्गत राजकारणाला महत्त्व देण्याचे कारण नाही. त्याऐवजी या विधानाची तात्काळ दखल घेत जागतिक पटलावर आवाज उठवणे आवश्यक आहे.

## गुड मॉर्निंग
दिवसाची अर्थपूर्ण सुरुवात

### पंचांग

**सोमवार, दिनांक २३ सप्टेंबर २०२४**
भाद्रपद कृ. ६ बृहस्पती पूजन श्री शके १९४६, विक्रम शोभन २०७९, क्रोधीनाम संवत्सर, दक्षिणायन, वर्षा ऋतू, षष्ठी श्राद्ध, शुभ दिवस (दु. १.५० पर्यंत.) सप्तमी श्राद्ध, श्री ज्ञानेश्वरी जयंती, सती जानकीमाता पुण्यतिथी – काटोल (नागपूर)
**सूर्योदय :** स.०६.०५ **सूर्यास्त :** सायं.०६.०७ वा
**नक्षत्र** : रोहिणी, योग : सिद्धि, **करण :** विष्टि
**राहू काळ : सकाळी :** ७:३० ते ९:००

### दिनविशेष



*१८४५: नेपच्यून ग्रहाचा शोध *१८०३ : इंग्रज-मराठा सैन्यात अरुई इथे तुंबड लढाई *१८७३: सत्यशोधक समाजाची स्थापना *१८८४ रावबहादूर नारायण मेघाजी लोखंडे यांनी बॉम्बे मिल हॅंड्स नावाने गिरणी कामगारांची संघटना स्थापन केली. *१९०८ हिंदी कवी व लेखक 'दिनकर'राजधारीसिंह यांचा जन्म *१९११: आर. संगमेश्वर कृष्णन या भारतीय पदार्थ वैज्ञानिकाचा जन्म.*१९१९: शिक्षणतज्ञ व पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरु देवदत्त दाभोळकर यांचा जन्म. *१९२०: नाट्यदिग्दर्शक, अभिनेते आणि विज्ञानलेखक भालचंद्र वामन 'भालबा' केळकर यांचा जन्म *१९४७: कवी 'बेक्स 'किशनचंद्र तीरथदास खत्री यंचे निधन *१९६४ : साहित्यिक मामा वरेरकर स्मृतिदिन *१९१९ : अभिनेत्री दुर्गा खोटे यांचे निधन *१९९९: चित्रपट दिग्दर्शक गिरीश घाणेकर यांचे निधन.

### राशीभविष्य

*मेष : शेजाऱ्यांचे सहकार्य लाभेल. *वृषभ : व्यवसायिक संबंध प्रस्थापित होतील. *मिथुन : जवळचे प्रवास सुखाचे करणारा. *कर्क : मोठ्या व्यक्तींची मदत लाभेल. *सिंह : जुने मित्र भेटतील. *कन्या : नवीन ओळखीचा फायदा होईल. *तुळ : विद्यार्थांना यश लाभेल, आनंद मिळेल. *वृश्चिक : बदली होण्याची शक्यता. *धनु : जनसंपर्कातून लाभ होईल. *मकर : सहकाऱ्याची मदत मोलाची ठरेल. *कुंभ : अडचणींना सामोरे जावे लागेल. *मीन : नवीन खरेदीचे मनसुबे आखाल.

### मेसेज आया

कोणीही चोरू शकणार नाही अशी संपत्ती कमवण्याचा प्रयत्न करा...
ते म्हणजे नाव आणि इज्जत राजाला त्याची प्रजा मानते.... पण बुद्धिवंताला सारी दुनिया मानते.. पद महत्तवाचे नसते. आपल्या विचारांची गुणवत्ता महत्वाची असते...
ज्याचे कर्म चांगले आहे तो कधी संपत नसतो....



### व्यक्तीविशेष
## जोहान गॉटफ्राईड गॉल.

जोहान गॉटफ्राईड गॉल हे जर्मन खगोलशास्त्रज्ञ होते. त्यांनी त्यांचा विद्यार्थी हेन्रिक डीअरेस्ट यांच्या मदतीने नेपच्युन या ग्रहाचा शोध २३ सप्टेंबर १८४६ रोजी लावला. १८ सप्टेंबर १८४६ रोजी गॉल यांना पत्र लिहिले. हे पत्र गॉल यांना २३ सप्टेंबर १८४६ रोजी मिळाले. त्यात वेरियर यांनी गॉल यांना आकाशात विशिष्ट ठिकाणी निरीक्षण करायला सांगितले होते. त्याच रात्री गॉल यांनी सांगितल्याप्रमाणे निरीक्षण केले आणि नेपच्यूनचा शोध लागला. १८५१ मध्ये ब्रेस्लू या शहरात त्यांनी खगोलशास्त्राच्या प्राध्यापकाची नोकरी पत्करली. संपूर्ण आयुष्यभर त्यांनी धुमकेतूंचा अभ्यास केला. १८९४ मध्ये त्यांचा मुलगा अँड्रेस गॉल याच्या मदतीने त्यांनी ४१४ धुमकेतूंची यादी प्रकाशित केली. २ डिसेंबर १८३९ ते ६ मार्च १८४० या अवघ्या तीन महिन्यांच्या कालावधीत गॉल यांनी तीन धुमकेतूंचा शोध लावला. चंद्रावरील दोन विवरे, मंगळावरील एक विवर आणि नेपच्यून ग्रहाभोवतीचे कडे यांचा शोध गॉल यांनी लावला. गॉल यांचे १० १९१० रोजी पॉट्सडॅम येथे निधन झाले.

### बोधकथा
## ऐकावे जनाचे

रामू आपल्या मुलाला आणि गाढवाला घेऊन आठवड्याच्या बाजाराला निघाला होता. गाढव आणि हे दोघे बाप लेक रस्त्यावरून चालत होते. एका माणसाने त्यांना पाहिले आणि तो म्हणाला, काय भाऊ, गाढवाला घेऊन चाललाय, त्यावर तुमच्या मुलाला तरी बसवा की, रामूने मुलाला गाढवावर बसायला सांगितले. मुलगा गाढवावर बसला. थोडे पुढे गेल्यावर एक जोडपे दिसले. त्यातील बाई मुलाकडे बघून जोरात ओरडली, काय रे तुला काही कळतं की नाही? बिचारा बाप चालला आहे उन्हातून आणि तो बसलासय होस आरामात गाढवावर? रामूचा मुलगा गाढवावरून उतरला आणि वडिलांना म्हणाला, बाबा तुम्ही बसा गाढ्वावर. मग रामू गाढवावा बसला. पुढे गेल्यावर एक घोळका दिसला. त्यातला एक माणूस म्हणाला, काय या बापाला काळजी हाये का नाही? पोरगं बिचारं उन्हातनं पायी चालतंय आणि हा गडी बसलाय आपला गाढवावर. शेवटी रामू आणि त्याच्या मुलाने गाढवाचे पाय एका काठीला बांधले आणि त्याला खांद्यावर घेऊन चालू लागले. त्यांना तसे जाताना रस्त्यावरचे लोक जोरजोरात हसू लागले. तो आवाज ऐकून गाढवाने आपली सुटका करून घेऊन धूम ठोकली.
**तात्पर्य :- प्रत्येकाचे समाधान आपण करू शकत नाही.**

### भूगोल
## वनस्पती-औषधी गुण असलेल्या सपुष्प वनस्पती

औषधी गुण असलेल्या सपुष्प वनस्पती या हिरव्या आणि नाजुक खोडांच्या असतात. त्यांची आयुर्मर्यादा एक ते दोन वर्षांची असते. एक वर्ष जगणाऱ्या वनस्पती बियांपासून तयार होतात. मग त्यांना फुले येतात आणि पुन्हा बिया तयार होतात. गाजरासारख्या दोन वर्षे जगणाऱ्या वनस्पतींमध्ये पहिल्या वर्षी बियांपासून वनस्पती तयार होते, त्यातून पाने तयार होतात आणि अन्न जमिनीखालील अवयवात साठवले जाते. हिवाळ्यात खोड आणि पाने गळून पडतात. दुसऱ्या वर्षी साठवलेल्या अन्नातून नवी खोडे पुन्हा तयार होतात, पाने, फुले आणि बिया येतात आणि नंतर ती मरण पावतात. काही औषधी गुण असलेल्या वनस्पती वर्षानुवर्षे येतात. उदाहरणार्थ बटाटे. उन्हाळ्यात त्यांना फुले आणि पाने येतात. त्यावेळी जमिनीखालील अवयवांत अन्न साठवून ठेवतात. हिवाळ्यात मरण पावतात. आणि नंतर जमिनीखालील अवयवात साठवलेल्या पाण्यामुळे पुन्हा अंकुरतात. (क्रमश:)

### नवं संशोधन
## निगेटिव्ह रक्तगटाचे लोक या लोकीचे नाहीत?

ही संशोधक मंडळीही अनेक वेळा भन्नाट संशोधन करीत असतात. आता काही संशोधकांनी म्हटले आहे, की ज्यांचा रक्तगट निगेटिव्ह आहे, ते या लोकीचे नाहीत. त्यांचे पूर्वज हे परग्रहवासीय होते. एलियन्स म्हणजेच परग्रहवासीय, उडत्या तबकड्या आणि तत्सम बार्बीवर संशोधन करणारे तसेच भन्नाट निष्कर्ष काढणारे अनेक लोक आहेत. हे संशोधकही त्यापैकीच आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार ८५ टक्के पॉझिटिव्ह रक्तगटवाले लोक वानरापासून उत्क्रांती होऊन माणूस बनलेल्यांमध्ये मोडतात; मात्र अन्य १५ ते १६ टक्के लोक अलौकिक वंशाचे आहेत. एचआर पॉझिटिव्ह रक्तगट असलेल्या मातेचे शरीर कधीही एचआर निगेटिव्ह रक्तगटाचे बाळ स्वीकारत नाही. त्यामुळे अनेक बाळांचा मृत्यूही झालेला आहे. विज्ञानही असे मानते, की मानव विकासाच्या प्रक्रियेत एचआर निगेटिव्ह रक्तगटाच्या लोकांचे अस्तित्व हे नैसर्गिक नाही. एलियनवादी संशोधकांचे म्हणणे आहे, की अतिप्राचीन काळी परग्रहवासी पृथ्वीवर आले होते आणि त्यांनी येथील महिलांबरोबर संबंध स्थापन करुन अपत्यांना जन्म दिला. निगेटिव्ह रक्तगटाचे लोक त्यांचेच वंशज आहेत, असा त्यांचा दावा आहे!

### सोडवा सुडोकू

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

**क्रमांक ४४५**

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | | 1 | |
| | 3 | | 4 |
| 4 | | 3 | |
| | | | |

**क्रमांक ४४४ चे उत्तर**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 3 | 4 | 2 | 1 |
| 4 | 3 | 1 | 2 |
| 2 | 1 | 4 | 3 |

### हास्यविनोद

पेशंट डॉक्टरना उत्साहाने म्हणाला, डॉक्टर तुम्ही दिलेले औषध चांगलेच लागू पडले बघा. पूर्वी मी मुलांना देखील काही बोलू, रागवू शकत नव्हतो, आता मुलांच्या आईलाही चांगले फैलावर येतो. डॉक्टरांनी दुसऱ्या दिवसापासून ते औषध स्वत:घ्यायला सुरूवात केली.



### महिलायन
## कृपया काळजी घ्या...

अलिकडे सौंदर्योपचारासाठी गल्लोगल्ली ब्युटी पार्लर उघडलेले दिसतात. आपल्याकडे गिऱ्हाईकांनी यावे म्हणून बऱ्याचशा पार्लरचे मालक स्वस्तात उपचार करण्याचे पॅकेजेस देतात. ग्राहकाचा खरच फायदा असेल तर अशा पॅकेजेसला हरकत नसावी. पण बरेचदा असे पार्लर मालक प्रशिक्षित किंवा पद्वीधारक नसतात. वेगवेगळ्या थेरपींद्वारे उपचार करणारे म्हणून दावा केला जातो. पण खऱ्या अर्थाने सखोल अभ्यास करणारे सगळेच असतात असे नाही. बऱ्याचजणी आठ, पंधरा दिवसांचा कोर्स करून स्वत:चे पार्लर सुरु करतात आणि स्किन ट्रीटमेंटबाबत दावाही करतात. त्यामुळे अशा अपूर्ण माहिती असलेल्या व्यक्तीकडून आपल्या त्वचेवर उपचार करण्यापूर्वी १०० वेळा विचार केला पाहिजे. बरेचदा नवशिके पार्लर चालवणारे स्वस्तातील उत्पादने वापरतात. शिवाय चुकीच्या पद्धतीने ते चेहऱ्यावर वापरल्यावर चेहऱ्याची त्वचा खराब होऊ शकते. काही पार्लरमध्ये स्वच्छता व्यवस्थित पाळली जात नाही. एकमेकांचे स्पंज, उपचारांचे साहित्य, शुद्ध-स्वच्छ न करता वापरल्यास संक्रमण होऊन त्वचारोग होऊ शकतो. तसेच कंगवे, कात्री, ब्रशेस, पावडर पफ, टॉवेल या सर्वांच्याच स्वच्छतेबाबत आपण जागरूक राहिले पाहिजे. **(पूर्वार्ध)**

### घरगुती औषध
## कासमर्द



यू.पी. किंवा माळव्यात ही झाडे बागेत किंवा जंगलात बाराही महिने दृष्टीस पडतात. तिकडे त्यांना कासोंदी म्हणतात. त्याचा अनुभव खालीलप्रमाणे आहे विंचवाचे विषावर- कासोदीची मुळी पाण्यात उगाळून दंशस्थानी लावावी. तत्काल विष उतरते. खाजेवर - याचे मूळ व चंदन उगाळून लावले असता खाज जाते. सर्पविषावर- कासमर्दाचे मूळ व काळे मिळी तुपात वाटून पोटात दिल्यास सर्पविष उतरते.

### मराठी व्याकरण
## प्रथम व्यंजन संधी

पहिल्या पाच वर्गांपैकी अनुनासिकाशिवाय कोणत्याही व्यंजनापुढे कठोर व्यंजन आले असता त्या पहिल्या व्यंजनाच्या जागी त्याच्याच वर्गातील पहिले कठोर व्यंजन येऊन संधी होतो. याला प्रथम व्यंजन संधी म्हणतात. उदाहरणार्थ : विपद् + काल = विपत्काल. (द् + क् = त् + क= त्क). यामध्ये पहिल्या शब्दाचा शेवटचा वर्ण हा पहिल्या पाच वर्गांपैकी अनुनासिकाशिवाय असणारे व्यंजन आहे. दुसऱ्या शब्दातील पहिला वर्ण हे कठोर व्यंजन आहे. संधी होताना पहिल्या व्यंजनाच्या ठिकाणी त्याच्या वर्गातील पहिले कठोर व्यंजन येऊन संधी झाला आहे.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com

### राज्यात मराठ्यांवर अन्याय सुरू असल्याचा आरोप

# आरक्षण मुद्यावरून मनोज जरांगेंचा सरकारला थेट इशारा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**जालना :** राजकारणात जायचं नाही म्हणून मी उपोषणाला बसलो असून मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देण्यासाठी देवेंद्र फडणवीसांना ही शेवटची संधी आहे. त्यानंतर त्यांना आरक्षणाच्या विषयावर तोंडही उघडता येणार नाही, असा इशारा मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. तसेच राज्यात मराठ्यांवर अन्याय सुरू असून सरकारकडून हे सगळं ठरवून हे



केलं जातं आहे, असा आरोपही त्यांनी केला.

मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण मिळावं, या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील हे सध्या आंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसले आहेत. नुकताच त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य केलं. तसेच त्यांनी वडीगोद्री येथे झालेल्या मराठा-ओबीसी संघर्षाबाबतही प्रतिक्रिया दिली.

"राज्यात मराठ्यांवर अन्याय सुरू आहे. सरकारकडून ठरवून हे सगळं केलं जातं आहे. त्यामुळे मराठा समाजातील तरुण रस्त्यावर उतरले आहेत. मी फक्त राजकारण ज्यायचं नाही म्हणून उपोषणाला बसलो आहे. मराठ्यांना ओबीसीतून आरक्षण देण्याची देवेंद्र फडणवीस यांना ही शेवटची संधी आहे. त्यानंतर त्यांना आरक्षणाच्या मुद्द्यावर तोंड उघडता येणार नाही. आरक्षण मिळालं नाही, तर त्यांना देवेंद्र फडणवीस दोषी असतील, अशी प्रतिक्रिया मनोज जरांगे पाटील यांनी दिली. तसेच एक दोन दिवसांत आरक्षणाचा निर्णय होईल", अशी अपेक्षा आहे, असेही ते म्हणाले.

# मुंबई उपनगरातील शिंदे गटाच्या जागेवर भाजपचा दावा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आगामी विधानसभा निवडणुका तोंडावर येऊन ठेपल्या आहेत. त्यातच आता सर्व पक्षांकडून मोर्चेबांधणीला सुरुवात झाली आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्व पक्ष मैदानात उतरले आहेत. त्यातच आता अनेक पक्षात इनकमिंग-आऊटगोईंग सुरु झाले आहे. त्यातच आता महायुतीत शिंदे गटाच्या एका जागेवर भाजपकडून दावा करण्यात आला आहे. मुंबईतील जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदारसंघावर भाजपच्या कार्यकर्त्यांनी दावा केला आहे. भाजपच्या माजी नगरसेविका उज्वला मोडक यांनी या मतदारसंघावर दावा केला आहे.



लोकसभा निवडणुकीत विजयी झाल्यानंतर विद्यमान आमदार रवींद्र वायकर यांनी जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदारसंघातून आमदार पदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर आता येत्या विधानसभा निवडणुकीसाठी भाजपच्या कार्यकर्त्यांनी जोगेश्वरी विधानसभेवर दावा केला आहे. भाजपच्या माजी नगरसेविका उज्वला मोडक यांनी नुकतंच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी उज्वला मोडक यांनी देवेंद्र फडणवीसांना एक पत्र दिले. या पत्रात त्यांनी जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदारसंघावर दावा सांगितला आहे. भाजपने जोगेश्वरी पूर्वची जागा लढवल्यास या ठिकाणी महायुतीचा उमेदवार विजयी होईल. पण जर शिवसेनेला ही जागा सोडली तर या ठिकाणी महायुतीचा उमेदवार विजयी होणं अशक्य आहे, असे उज्वला मोडक यांनी पत्रात म्हटले आहे.

रवींद्र वायकर हे जोगेश्वरी पूर्व विधानसभा मतदारसंघातून तीनवेळा आमदार म्हणून निवडून आले आहेत. मात्र आता रवींद्र वायकर हे खासदार झाल्याने ही जागा रिक्त झाली आहे. आता भाजपने या जागेवर दावा केला आहे. माजी नगरसेविका उज्वला मोडक आणि रवींद्र वायकर हे जुने विरोधक आहेत. तरीही लोकसभेत निवडून येण्यासाठी भाजपने वायकरांना मोठी मदत केली आहे. त्यानंतर आता विधानसभेत जोगेश्वरी विधानसभा भाजपचं जिंकू शकते, असा दावा कार्यकर्त्यांकडून केला जात आहे.

इन्फोग्राफिक्स

## प्रतापगड राज्य संरक्षित स्मारक घोषित

जागतिक वारसा



**सातारा-** साताऱ्यातील ऐतिहासिक प्रतापगड (ता. महाबळेश्वर) हा किल्ला राज्य संरक्षित स्मारक म्हणून राज्य शासनाने घोषित केले आहे. लवकरच युनेस्कोद्वारा जागतिक वारसा स्थळ २०२४ यादीत प्रतापगडचे नामांकन करण्यासाठी त्यांचे पथक गडावर येणार आहे. त्या अनुषंगाने प्राचीन व ऐतिहासिक स्मारक संरक्षित स्मारक म्हणून घोषित केल्याने शासनाच्या अधिसूचनेला महत्त्व प्राप्त झाले आहे. प्राचीन व ऐतिहासिक स्मारक संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याचा शासनाचा इरादा असल्याने याबाबत कोणाची काही हरकत असल्यास ती घेण्यासाठी दोन महिन्यांची मुदत दिली होती. किल्ले प्रतापगड संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यासंबंधी शासनाकडे कोणत्याही हरकती आलेल्या नाहीत. त्यामुळे प्राचीन व ऐतिहासिक स्मारक हे संरक्षित स्मारक असल्याचे शासनाने अधिसूचना काढत जाहीर केले आहे.

» Selected

## मुंबई विद्यापीठाची सिनेट निवडणूक २४ सप्टेंबरला

**मुंबई:** मुंबई विद्यापीठ निवडणुका रविवारी २२ सप्टेंबर रोजी घेण्यात



याव्यात असे उच्च न्यायालयाने निर्दोष दिले होते.त्यानंतर मुंबई विद्यापीठाच्या वतीने उच्च न्यायालयात एक प्रतिज्ञापत्र सादर करत रविवारी २२ सप्टेंबर ऐवजी दिनांक २४ सप्टेंबर रोजी मंगळवारी घेण्यात याव्यात अशी विनंती उच्च न्यायालयाकडे केली होती.ती विद्यापीठाची विनंती उच्च न्यायालयाने मान्य केली आहे.त्यामुळे आता रविवारी दिनांक २२ सप्टेंबर रोजी होणाऱ्या निवडणूका दिनांक २४ सप्टेंबर रोजी मंगळवारी होणार आहेत. तर यांची मतमोजणी ही दिनांक २७ सप्टेंबरला शुक्रवारी होणार आहे.अशी माहिती समोर आली आहे.

## मुंबई विमानतळावर कस्टम विभागाची मोठी कारवाई

**मुंबई :** शहरात सीमाशुल्क विभागाने शुक्रवारी २०-२१ सप्टेंबरच्या रात्री दोन वेगवेगळ्या प्रकरणात एकूण २.२८६ किलो सोने आणि हिरे जप्त केले. या हिऱ्यांची आणि सोन्याची अंदाजे किंमत १.५८ कोटी रुपये (सोन्याची किंमत) आणि १.५४ कोटी रुपये (हिऱ्यांची किंमत) आहे. हा माल प्रवाशांच्या अंगावर बनवलेल्या विशेष ठिकाणी, वेस्टमधील गुप्त ठिकाणी आणि पँटच्या पट्ट्याजवळ लपवून ठेवण्यात आला होता. याप्रकरणी तीन प्रवाशांना अटक करण्यात आली आहे. पहिल्या प्रकरणात, विमानतळावरील कस्टम्सने दुबईहून मुंबईत येणाऱ्या एका प्रवाशाला थांबवले आणि त्याच्याकडून तस्करीचा माल जप्त केला, ज्यात २४ कॅरेट सोन्याचे (एकूण वजन १४०० ग्रॅम) १२ बार होते, ज्याची अंदाजे किंमत ९७,००,२३६ रुपये आहे.

# आरक्षण मिळत नसल्याने शेतकऱ्याची आत्महत्या

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**बीड :** मराठा समाजाला आरक्षण मिळत नसल्याने बीड जिल्ह्यातील पाटोदा येथील शेतकरी अमोल निलंगे या शेतकऱ्याने आत्महत्या करुन आपली जीवनयात्रा संपवली आहे.आत्महत्या पूर्वी अमोल यांनी एक चिठ्ठी लिहून ठेवली आहे.यात कर्जमाफी केल्याची मोठ्या प्रमाणावर जाहिरात करणा-या महायुती सरकारची पोलखोलच केली आहे. अमोल यांनी शेतीच्या कामा



करीता ट्रॅक्टर घेतला होता.तसेच शेतीवर देखील कर्ज घेतले होते.व सतत होणाऱ्या नापिकीमुळे त्यांना ट्रॅक्टरचा हाप्ता व शेतीवरील कर्ज ते फेडू शकले नाही. त्यांच्या मुलाचा सैनिक स्कुल यादीत नंबर सर्वात शेवटी आल्याने त्याला सैनिक स्कूल मध्ये दाखल होता न आल्याने ते निराशाजनक अवस्थेत होते. तसेच जर मराठा समाजाला आरक्षण असते तर तो मेरिटमध्ये आला असता. पण आरक्षण नसल्याने हे सर्व मराठा समाजाच्या युवकांच्या नशिबी येत आहे. त्यामुळे त्यांनी नैराश्यातून आत्महत्या करतोय, असे अमोलने सुसाइड चिठ्ठीत लिहून आत्महत्या केली आहे. त्यामुळे आता हे महायुतीचे सरकार अजून किती मराठा समाजाच्या युवकांचा बळी घेणार आहे.? असा आता गंभीर असा प्रश्न सर्व मराठा युवकांना पडला आहे.

## उदे ग अंबे उदे...

पंढरी संचार छायाचित्रसेवा



**कोल्हापूर** शारदीय नवरात्रौत्सवानिमित्त करवीर निवासिनी श्री अंबाबाई मंदिरात पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या वतीने जोरदार तयारी करण्यात येत आहे.

# पाकिस्तानी अभिनेत्याच्या चित्रपटाला राज ठाकरेंचा विरोध

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** पाकिस्तानी अभिनेता फवाद खान आणि माहिरा खान यांचा बहुचर्चित पाकिस्तानी चित्रपट 'द लेजंड ऑफ मौला जट्ट' हा चित्रपट येत्या २ ऑक्टोबर रोजी भारतात प्रदर्शित होणार आहे. मात्र प्रदर्शनापूर्वीच हा चित्रपट वादात सापडलाय. याप्रकरणी राज ठाकरे यांनी ट्विट केले आहे.

'फवाद खान नावाच्या पाकिस्तानी अभिनेत्याचा, 'लिजेंड ऑफ मौला जट' नावाचा सिनेमा लवकरच भारतात प्रदर्शित होणार आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा सिनेमा कुठल्याही परिस्थितीत महाराष्ट्रात प्रदर्शित होऊ देणार नाही. पाकिस्तानी कलाकारांचे सिनेमे मुळात भारतात प्रदर्शित का होऊ दिले जातात? आणि कलेला देशांच्या सीमा नसतात,




हे सगळं इतर बाबतीत ठीक आहे, पण पाकिस्तानच्या बाबतीत हे अजिबात चालू देणार नाही. हिंदुस्थानचा द्वेष या एकमेव मुद्द्यावर जो देश तगला आहे, अशा देशातील कलाकारांना इथे आणून नाचवणं, त्यांचे सिनेमे प्रदर्शित करून देणं हा काय प्रकार सुरु आहे? महाराष्ट्र सोडाच पण देशातील कुठल्याच राज्यात हा सिनेमा तिथल्या तिथल्या सरकारांनी प्रदर्शित होऊ नाही दिला पाहिजे,' असं राज ठाकरे यानी म्हटले आहे.

'त्यामुळे वेळीच पाऊलं उचलून हा सिनेमा आपल्याकडे प्रदर्शित होणार नाही हे पहावं. मराठी सिनेमांना थिएटर्स उपलब्ध करून देताना मागेपुढे करणाऱ्या थिएटर मालकांनी जर पाकिस्तानी सिनेमाला या भूमीत पायघड्या घातल्या, तर हे औदार्य महागात पडेल हे विसरू नये. कुठल्यातरी पाकिस्तानी सिनेमासाठी राज्यात संघर्ष होऊ नये अशीच माझी इच्छा आहे आणि सरकार त्याकडे योग्य ते लक्ष देईल याची मला खात्री आहे,' असेही त्यांनी म्हटले आहे. तर 'हा सिनेमा जेव्हा प्रदर्शित होणार आहे, त्याच्या आसपास नवरात्रौत्सव सुरु होणार आहे. अशावेळेस कुठलाही संघर्ष महाराष्ट्रात व्हावा अशी माझी इच्छा नाही आणि तशीच ती इच्छा राज्याचे मुख्यमंत्री, गृहमंत्री आणि राज्याच्या पोलीस महासंचालकांची पण नसणार आणि उगाच संघर्ष आम्हाला पण नको आहे,' अशा थेट इशारा राज ठाकरेंनी दिला आहे.

# दौंड बाजार समितीच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**दौंड :** 'दौंड कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सत्ता परिवर्तन झाल्यावर आम्ही कामकाजाला सुरवात केली. विविध उपाययोजना केल्याने गेल्या सात महिन्यात एकूण मार्केट फी तीन कोटी ८९ लाख रूपये जमा झाली" असल्याची माहिती सभापती गणेश जगदाळे यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत दिली. दौंड कृषी उत्पन्न बाजार समितीची २१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चौफुला (ता.दौंड) येथे पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानावरून जगदाळे बोलत होते. यावेळी आमदार राहुल कुल, भीमा पाटसचे उपाध्यक्ष नामदेव बारवकर, कांचन कुल, बाजार समितीचे उपसभापती शरद



कोळपे, भाजपचे तालुकाध्यक्ष हरिश्चंद्र ठोंबरे, ॲड. प्रशांत गिरमकर, किरण देशमुख, संदीप गायकवाड उपस्थित होते.

गणेश जगदाळे म्हणाले, आमदार राहुल कुल यांच्या मार्गदर्शनामुळे बाजार समितीला चांगला फायदा होऊन मोठ्या प्रमाणात निधी मिळत आहे. दौंड येथील मुख्य बाजार आवारातील १३ व्यापारी गाळ्यांचे काम लवकरच सुरू होत आहे. दौंड आवारातील रस्त्यासाठी ५० लाख रूपयांचा निधी दिला असून आठवड्याभरात काम सुरू होईल. व्यापारी गाळे व शेतकरी भवन दुरूस्ती ( १० लाख ), कांदा शेड उभारणी ( १३ लाख ७२ हजार ), तरकारी व डाळिंब शेड उभारणी ( १७ लाख ), संरक्षित भींत ( १२ लाख ) असा निधी कुल यांच्या प्रयत्नातून मिळालेला आहे. केडगाव येथे स्वमालकीच्या जागेचे सपाटीकरण चालू असून तेथे सुसज्ज बाजार आवाराची उभारणी करणार आहोत.

### आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा करणार प्रचार

# जम्मू-काश्मीरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक मातोश्रीवर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** - जम्मू आणि काश्मीर, गोवा आणि मेघालय या राज्यांचे राज्यपाल पद भूषविलेले आणि एकेकाळी भाजपाशी संबंधित असलेल्या सत्यपाल मलिक यांनी शिवसेना उबाठा गटाचे नेते आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा आपण प्रचार करणार असून या निवडणुकीत भाजपाचा सुपडा साफ होईल, अशी प्रतिक्रिया मलिक यांनी या भेटीनंतर दिली.

उद्धव ठाकरेंची भेट घेऊन बाहेर आल्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना सत्यपाल मलिक म्हणाले,



"विधानसभा निवडणुकीत भाजपाला नुसताच फटका बसणार नाही तर या निवडणुकीत त्यांचा सुपडा साफ होईल. या निवडणुकीत उद्धव ठाकरे महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. त्यामुळे कुणाला काळजी करण्याची गरज नाही."

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारवरी मलिक यांनी जोरदार टीका केली. इंग्रजीमधील 'लास्ट नेल इन बीजेपी कॉफिन' ही प्रसिद्ध ओळ उद्धृत करत मलिक म्हणाले की, महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांचे निकाल हे भाजपासाठी अंताची सुरुवात असेल.

# विश्ववेध

## आतड्यातील जीवाणू आणि दीर्घायुष्य



आतड्यातील जीवाणूंचा समतोल नीट साधला गेला तर माणसाचे आयुर्मान वाढू शकते, असे वैज्ञानिकांचे मत आहे. 'बक इन्स्टिट्यूट फॉर रीसर्च ऑन एजिंग' या अमेरिकी संस्थेच्या संशोधकांनी जीवाणूंवर हे संशोधन केले असून त्यामध्ये सिंबायोटिक प्रक्रियेवर नवीन प्रकाश टाकला आहे. यात आतड्याच्या शोषक पेशींचे अस्तर व जीवाणू यांच्यातील परस्पर संबंध उलगडला आहे. साध्या फळमाशीवर याबाबत प्रयोग करण्यात आला.

वृद्धत्वास कारण ठरणाऱ्या जीवाणूंना निष्प्रभ केल्यास आरोग्यदायी जीवन जगता येईल, असे या संशोधनाचे मुख्य सूत्र आहे. प्रमुख संशोधक असलेले हेनरिच जॅसपर यांनी सांगितले की, काही जीवाणूंमुळे आतड्यावर विपरित परिणाम होऊन वृद्धत्वाच्या प्रक्रियेस वेग मिळतो. जीवाणूंमुळे आतड्यात जे बदल होतात त्यामुळे ऑक्सिडेटिव्ह ताण, दाह, प्रतिकार शक्तीत बिघाड व मूलपेशींची जास्त वाढ असे परिणाम होतात. आतड्यावर जे परिणाम होतात ते जीवाणूंच्या असमतोलामुळे, तर काहीवेळा अनुवंशिक कारणास्तव होतात. फळमाशीत वयपरत्वे आतड्यातील जीवाणूंचा भार वाढतो व त्यामुळे दाह निर्माण होतो. 'एफओएक्सओ' या ताणाशी संबंधित जनुकाच्या क्रियान्वयनामुळे असमतोल निर्माण होतो, त्यामुळे 'पीजीएलवायआरपी' या रेणूंची क्रिया मंदावते. परिणामी जीवाणूंचा प्रतिकारशक्ती यंत्रणा म्हणून प्रतिसाद कमी होतो. मुक्तकण हे आतड्यातील मूळपेशींची वाढ जास्त प्रमाणात करतात व त्याला कर्करोगापूर्वीची एपिथेलियल डिसप्लासिया असे नाव आहे. जॅसपर यांच्या मते जर पीजीआरपी-एससी नावाच्या रेणूंना कार्यान्वित केले तर आतड्यातील जीवाणूंचा समतोल साधला जाऊन मूलपेशींची अनिर्बंध वाढही रोखली जाते. औषधांच्या मदतीने या रेणूंची नक्कल करता आली तर फळमाशीचा आयुष्यकाल वाढवता येतो. 'सेल' नावाच्या नियतकालिकात शोधनिबंध प्रकाशित झाला.

## आता अन्नपदार्थांचं स्कॅनिंग



सध्या अनेक लोक 'कॅलरी कॉन्शस' झालेले आहेत. त्यामुळे समोर आलेल्या अन्नपदार्थांमध्ये किती कॅलरीज आहेत, याबरोबरच त्यामध्ये कोणकोणते घटक आहेत हे जाणून घेण्याची त्यांची इच्छा होत असते. शिवाय अन्नात अनेक अपायकारक तसेच उपकारक घटकही असतात व ते ओळखणारा स्कॅनर संशोधकांनी विकसित केला आहे. तो सहज वापरता येणारा तर आहेच, पण स्मार्टफोनलाही तो जोडता येतो. आपण जे अन्न खातो त्यात ॲलरजेन, रसायने, पोषके व उष्मांक असे अनेक घटक असतात. या स्कॅनरच्या मदतीने ते नेमके कोणते आहेत हे समजते. 'टेलस्पेक' असे या स्कॅनरचे नाव असून तो टोरांटो येथे तयार करण्यात आला आहे, हा स्कॅनर तुम्ही तुमच्या अन्नपदार्थावर धरल्यानंतर तुम्ही त्यातील सर्व घटक ओळखू शकतो.

विशेष करून ज्यांना आपल्या प्रकृतीची काळजी आहे, ज्यांना लठ्ठपणा टाळण्यासाठी अन्नपदार्थातील उष्मांक जाणून घेणे गरजेचे आहे त्यांच्यासाठी हे वापरण्यास सोपे असे उपकरण आहे. यात तुम्ही निवडलेल्या अन्नघटकातील शर्करा, मेद व इतर सर्व घटकांचे ग्रॅममागे असणारे प्रमाण या स्कॅनरच्या मदतीने सांगता येते. त्यामुळे लोकांना स्वच्छ व आरोग्यकारक अन्नपदार्थ ओळखणे सोपे होईल. आपण जसे मेल चेक करतो तितक्या सोपेपणाने अन्नपदार्थातील घटक ओळखता येतील. या स्कॅनरमध्ये छोटासा रामन स्पेक्ट्रोमीटर बसवलेला असून तो वेगळ्या क्लाऊड आधारित अलगॉरिथमवर आधारित आहे. त्यात एक साधे स्मार्टफोन ॲपही वापरलेले आहे.

अन्नघटकांचे स्कॅनिंग हे अन्नपदार्थ तुमच्या ताटाच असताना किंवा तुम्ही अन्नपदार्थाचे शॉपिंग करीत असताना करता येईल, त्यासाठी हा स्कॅनर अन्नपदार्थाच्या दिशेने धरायचा व एक बटन दाबायचे. त्यानंतर कमी ऊर्जेचे किरण त्यातून बाहेर पडतात व ते अन्नपदार्थावर आपटून परत येतात, त्यावरून तुमच्या अन्नाची रासायनिक घडण समजते. ही माहिती विश्लेषण इंजिनाला पुरवल्यानंतर त्याचे पृथक्करण होते. नंतर त्याची तुलना त्यात अगोदरच असलेल्या वर्णपंक्तीशी करून डाटाबेसच्या मदतीने निष्कर्ष दाखवले जातात. नंतर ते स्मार्टफोनवर डाऊनलोड करता येतात असे 'गिझमॅग' या नियतकालिकाने म्हटले आहे. अन्नपदार्थाचा पृष्ठभाग स्कॅन केल्यानंतर त्यातील घटक ९७.७ टक्के ओळखले जातात. यात किमान तीन हजार अन्नपदार्थाचे स्कॅनिंग करून त्याचा डाटाबेस तयार केला आहे, त्याच्याशी हे घटक ताडून पाहिले जातात, असे टोरांटोच्या ज्या कंपनीने हा स्कॅनर तयार केला त्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी इसाबेल हॉफमन व गणितज्ज्ञ स्टीफन वॉटसन यांनी सांगितले. जेवढे हे उपकरण जास्त वापरले जाईल तेवढे जास्त अन्नपदार्थ ओळखण्याची क्षमता त्यात आणता येईल.

## दाराला लावलेला दगड... नऊ कोटींचा



एखाद्या वस्तूची किंमत अनेकांना कळत नाही. साध्याच वाटणाऱ्या काही वस्तूही अमूल्य असू शकतात व ते कालौघात स्पष्ट झाले की सगळेच थक्क होतात. युरोपमधील रोमानिया देशातील एका छोट्याशा गावात राहणाऱ्या वृद्ध महिलेने मागील अनेक दशकांपासून न कळत अशीच एक मौल्यवान वस्तू जपून ठेवल्याचं उघड झालं आहे. मागील अनेक वर्षांपासून दरवाजा आपटू नये म्हणून जो दगड ही महिला वापरत होती तो मौल्यवान असल्याचं समोर आलं आहे. हा दगड साडेतीन किलोंचा आहे. हा खडक 'अंबर नगेट' म्हणजेच आपल्या सोप्या भाषेत सांगायचं झालं तर प्राचीन काळात डिंकासारख्या पदार्थापासून बनलेला खडकासारखा प्रकार असल्याचं समोर आलं आहे. या खडकाची किंमत आजच्या घडीला ९ कोटी रुपये इतकी आहे.

आतापर्यंतच्या मानवी इतिहासामध्ये सापडलेला हा अशाप्रकारचा सर्वाधिक वजनाचा खडक आहे. या खडकासारखा दिसणारा मौल्यवान दगड एका नदीपात्रात या आजीबाईंना सापडला होता. 'एल पैस' या प्रसारमाध्यमाने दिलेल्या माहितीनुसार, प्रोव्हेन्शीअल म्युझिअम ऑफ बुझौचे संचालक डॅनिअल कोस्टेच यांनी हा खडक मौल्यवान असल्याचं ओळखलं आणि त्याची खरी किंमत सांगितली आहे. पोलंडमधील कारको येथील म्युझिअम ऑफ हिस्ट्री येथे हा खडक पाठवण्यात आला असून, आता हा खडक ३८.५ कोटी ते ७ कोटी वर्षांपूर्वीचा असल्याचं स्पष्ट झालं आहे. दुर्दैवाने ज्या आजी हा खडक दरवाजा रोखून धरण्यासाठी वापरायच्या आणि ज्यांना हा नदीत सापडला त्यांचा मृत्यू १९९१ साली झाला आहे. या आजींच्या मृत्यूनंतर हा दगड त्यांच्या एका नातेवाईकाकडे होता. त्याला हा सामान्य दगड नाही हे समजलं आणि त्याने हा खडक रोमानियाच्या सरकारला विकण्याचा निर्णय घेतला.

**रोमानियाच्या सरकारला विकण्याचा निर्णय**

तज्ज्ञांनी हा खडक मौल्यवान असल्याचं निश्चित केलं आहे. 'वैज्ञानिक आणि संग्रहालयाच्या दृष्टिकोनातून हा शोध फार महत्त्वाचा आहे', असं डॅनिअल कोस्टेच यांनी म्हटलं आहे. या खडकाचं मूल्य पाहिल्यास सरकारच हा खडक या आजींच्या नातेवाईकाकडून विकत घेण्याची दाट शक्यता आहे. आता यासंदर्भात पुढील वाटाघाटी होतील, असं सांगितलं जात आहे. या महिलेच्या नातेवाईकांनी मध्यंतरी घरी एकदा चोरी झाली तेव्हा चोरांनी सोन्याचे काही दागिने चोरुन नेले होते. ते लोक या दगडासमोरून गेले तरी त्यांनी तो चोरला नाही! रोमानियामधील बुझौ प्रांतामध्ये अशाप्रकारे यापूर्वी अनेकदा मौल्यवान खडक सापडले आहेत. या भागात असे अनेक अति पुरातन खडक असल्याचे सांगितलं जातं.

## एका दिवसाचे ८४ लाख! भाडे

जगभरात अनेक सुंदर बेटं आहेत. त्यापैकी काही खासगी मालकीचीही आहेत. अशा बेटांची अनेक वेळा खरेदी-विक्रीही होत असते. तसेच पर्यटनासाठी अशी बेटं भाड्यानेही दिली जात असतात. फिलिपिन्समध्येही असेच एक खासगी बेटं आहे. त्या ठिकाणी राहण्यासाठी पर्यटकांकडून लाखो रुपये भाडे एक दिवसासाठी आकारले जाते. लाखो रुपये म्हणजे एका दिवसाचे ८४ लाख रुपये! एवढेच नाही तर येथे राहण्याचीही अट आहे. ती म्हणजे या ठिकाणी कमीत कमी तीन दिवस थांबावे लागणार आहे. म्हणजे या आयलँडवरील टूर कोट्यवधीमध्ये जाते!

फिलिपिन्समध्ये असलेल्या या खासगी बेटाचे नाव 'बनवा' आहे. अर्थात, त्याच्या या भाड्यामध्ये कोणतीही 'बनवाबनवी' नाही! १५ एकरमध्ये पसरलेले हे सुंदर, निसर्गरम्य बेट आहे. हे बेट फिलिपिन्समधील पलावन द्विपसमूहाचा भाग आहे. हे बेट आता एखाद्या आलिशान रिसॉर्टप्रमाणेच वापरले जात आहे. ते जगातील सर्वात महाग रिसॉर्ट आहे. फिलिपिन्समधील या बेटावर सहा व्हिला आहेत. एका व्हिलामध्ये चार बेडरूम, एक प्रायव्हेट इन्फिनिटी पूल, जकुजी यासारख्या आदी सुविध[illegible] आहे. प्रत्येक बेडरूममध्ये दोन जणांना थांबण्याची सुविधा आहे. एका व्हिलामध्ये आठ जण[illegible] राहू शकतात. फिलिपिन्समधील या बेटावर एका वेळी ४८ जण[illegible] राहू शकतात. या रिसॉर्टवर अर्थातच चारही बाजूंनी पाणी आ[illegible] यामुळे याठिकाणी सीप्लेन किंवा हेलिकॉप्टरनेच जाता येते. या बेटावर मनिलापासून दीड तासात हेलिकॉप्टरने जाऊ शकतो. एका बेडरूमचे भाडे २६५[illegible] डॉलर (२.२३ लाख रुपये) आहे. कमीत कमी एक व्हिला बुक करावा लागतो. यामुळे सामान्य सीजनमध्ये एका दिवसाचे भाडे नऊ लाख रुपये जाते. [illegible] ठिकाणी कमीत कमी तीन दिवसांसाठी बुकिंग करावे लागते. म्हणजे तीन दिवसांचे भाडे २७ लाख रुपये होते. पीक टाईममध्ये या ठिकाणचे भाडे ८४ लाख रुपये प्रति दिवस होते. म्हणजेच तीन दिवसांसाठी २.५० कोटी रुप[illegible] खर्च होतात.



## सतत चॉकलेट खावेसे वाटताहेत?



एखादी गोड किंवा चटकमटक पदार्थ कधीतरी खाण्याची इच्छा होत असतेच व त्यामध्ये असामान्य असे काहीच नाही. आपल्याला एखादा पदार्थ अचानक खाण्याची खूप इच्छा होते, ज्याला आपण 'क्रेव्हिंग' असे म्हणतो. पण, जर आपल्याला सतत एखादा पदार्थ खाण्याची 'क्रेव्हिंग' होत असेल, तर तो आरोग्याची समस्या किंवा पौष्टिक कमतरतेचाही संकेत असू शकतो. याविषयी आरोग्य तज्ज्ञांनी म्हटले आहे की विशिष्ट पदार्थ खाण्याची सतत इच्छा निर्माण होणे हे काही वेळा शरीरामधील पौष्टिक कमतरतेचेसुद्धा लक्षण असू शकते. तुम्हाला फॅट्सयुक्त पदार्थ खाण्याची इच्छा होणे हे मेंदूचे कार्य आणि हार्मोनल संतुलन यासाठी शरीराला ओमेगा-३ आणि ओमेगा-६ ची आणखी आवश्यकता असल्याचे लक्षण असू शकते. त्याशिवाय आहारात ए, डी, ई व के यांसारख्या जीवनसत्त्वांची कमरतासुद्धा असू शकते.

जर तुम्हाला सातत्याने चॉकलेट खाण्याची इच्छा होत असेल, तर तुमच्या शरीरामध्ये मॅग्नेशियमची कमतरता असू शकते. कारण- कोको हा मॅग्नेशियमचा चांगला स्रोत आहे आणि कोकोच्या बियांपासून चॉकलेट तयार होते. त्याशिवाय तुमच्या शरीरामध्ये व्हिटॅमिन बी आणि फॅटी ॲसिडचीही कमतरता असू शकते. जर तुम्हाला सतत गोड पदार्थ खाण्याची इच्छा होत असेल, तर तुमच्या शरीरमध्ये क्रोमियम, फॉस्फरस किंवा रक्तात साखरेची कमतरता असण्याची शक्यता आहे. जर तुम्हाला गोड खाऊन आनंद मिळत असेल, तर तुमच्या शरीरात सेरोटोनिन हार्मोन सक्रिय होऊ शकते आणि तुमचा मूड सुधारू शकतो. त्यामुळे तुम्हाला आनंद देणाऱ्या अधिक गोष्टी करा. जर तुम्हाला खारट पदार्थ खाण्याची इच्छा होत असेल, तर तुमच्या शरीरात सोडियमची कमतरता असू शकते.




याशिवाय कॅल्शियमच्या कमतरतेमुळे सुद्धा खारट पदार्थ खाण्याची इच्छा होते. त्यामुळे आपल्या आहारात थोडा दुधाचा समावेश करा. त्याशिवाय मॅग्नेशियम आणि पोटॅशियमच्या कमतरतेमुळेसुद्धा खारट पदार्थ खाण्याची इच्छा वाढू शकते. विशिष्ट पदार्थ खाण्याची इच्छा फक्त पौष्टिक कमतरतेचे लक्षण नव्हे, तर ही गोष्ट आरोग्याच्या समस्येचेसुद्धा संकेत देते. जसे की हार्मोनल असंतुलन, रक्तातील साखरेची पातळी अनियंत्रित असणे, तसेच तणाव किंवा नैराश्य यांसारख्या मानसिक आरोग्याच्या समस्यांचा सामना करावा लागू शकतो.

## मेंदूच्या समन्वयाची उकल[illegible]




मानवी मेंदू म्हणजे निसर्गाचा सर्वात मोठा चमत्कार आणि सर्वात गुंतागुंतीची रचना आहे. मेंदूच्या कार्यप्रणालीविषयी खुद्द मानवाला ही सतत कुतूहल वाटत आलेले आहे. मेंदूच्या दोन वेगवेगळ्या भागांत सहकार्य घडून एखादी संयुक्त कृती कशी घडते, याचे कोडे भारतीय वैज्ञानिकाच्या नेतृत्वाखालील संशोधक चमूने उलगडले आहे.

स्टॅनफर्ड विद्यापीठातील विद्युत अभियांत्रिकीचे प्राध्यापक कृष्णा शेणॉय यांनी मेंदूतील अंतर्गत भागात समन्वय कशा प्रकारे चालतो हे कोडे उलगडले आहे. मेंदूत अब्जावधी न्यूरॉन्स हे वेगवेगळ्या भागात असतात. मेंदूच्या प्रत्येक भागाला विशिष्ट कार्य वाटून दिलेले आहे.मेंदूला माहिती अनेक भागात प्राप्त होत असते; पण ती आवश्यक तेव्हाच कशी वापरली जाते यावरचे हे संशोधन शेणॉय यांच्या प्रयोगशाळेत झाले असून, मॅथ्यू टी. कॉफमन यांनीही त्यात सहभाग घेतला आहे. आपल्या बाहूंच्या हालचालींसह इतर व्यापक स्वरूपाच्या हालचालींवर त्यात प्रयोग करण्यात आले. त्यांनी हे तंत्र बाहूंच्या हालचालींवर वापरले असता त्यांना मेंदूचे विविध भाग अगोदर वेगवेगळ्या भागांत संदेश ग्रहण करतात व नंतर ते आवश्यकतेनुसार इतर भागांकडे पाठवतात. कॉफमन यांनी सांगितले, की आपल्या मेंदूतील न्यूरॉन्स सतत सतर्क असतात व मेंदूच्या एका भागाकडून दुसऱ्या भागाकडे नेमके काय संदेश जातात हे पाहणे महत्त्वाचे असते. वैज्ञानिकांनी माकडांना बाहूंची हालचाल करण्याचे विशिष्ट प्रशिक्षण दिले व त्यांना हालचाल करण्यापूर्वी विसावा घेण्यास शिकवण्यात आले. त्यांना हालचाल करण्यापूर्वी मेंदूची पूर्वतयारी करण्यास शिकवले गेले. त्यांच्या स्नायूंची मापने पूर्वतयारी व प्रत्यक्ष कृतीच्या वेळ[illegible] करण्यात आली. मेंदूत अतिशय गुंतागुंतीच्या नोंदी घेतल्य[illegible] जात असतात. बाहूच्या हालचाली मेंदूचे दोन भाग नियं[illegible] करीत असतात, ते मेंदूचा वरचा भाग जो काही इंच बाजूला असतो त्याचा समावेश असतो. यातील प्रत्येक भाग हा २ कोटी नूरॉन्सचा बनलेला असतो. वैज्ञानिक य[illegible] दोन्ही भागांचे वर्तन जाणून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत पण ते लाखो न्यूरॉन्स नेमके कसे काम करतात, हे पाहू[illegible] शकत नाहीत. त्यामुळे त्यांनी दोन भागातील प्रत्येकी १०[illegible] ते २०० न्यूरॉन्सचे नमुने घेतले व त्यांच्या मदतीने निष्क[illegible] काढले. हे संशोधन 'नेचर न्यूरोसायन्स' या नियतकालिकाने प्रसिद्ध केले आहे.

## लेबनॉनला भाजून काढले : देश सोडण्याचा इशारा

# बेरुतवर जोरदार हल्ला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**बेरुत/कैरो :** इस्रायल आणि लेबेनॉनमध्ये रविवारी जोरदार गोळीबार झाला, इस्रायलच्या लढाऊ विमानांनी लेबनॉनच्या दक्षिणेत सर्वात तीव्र बॉम्बवर्षाव केला, तर हिजबुल्लाहने इस्रायलच्या उत्तरेकडील लष्करी तळांवर रॉकेट हल्ले केल्याचा दावा केला. इस्रायलच्या लष्कराने सुमारे २९० लक्ष्यांवर हल्ले केले आणि हिजबुल्लाहवर हल्ले सुरूच ठेवणार असल्याचे सांगितले.

दरम्यान, इस्रायलने केलेल्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर अमेरिका, फ्रान्स, कॅनडा आणि ब्रिटन सरकारने लेबनॉनमधील आपल्या नागरिकांना लवकरात लवकर देश सोडण्याचा सल्ला दिला आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याने लेबनॉनला विमान सेवा उपलब्ध असतानाच बाहेर पडण्याचे आवाहन केले आहे. काही दिवसांत सुरक्षेची स्थिती आणखी बिघडू शकते, असेही अमेरिकेने म्हटले आहे.

इस्रायलने लेबनॉनवर केलेल्या हवाई हल्ल्यात हिजबुल्लाहचा म्होरक्या अहमद वाहबीसह अनेकांचा बळी गेला. बैरूतमध्ये इस्रायलने केलेल्या हल्ल्यात मृतांचा आकडा ३७ वर पोहोचला आहे.

बेरूतच्या दक्षिण उपनगरात शुक्रवारी इस्रायलने केलेल्या हल्ल्यात तीन मुले आणि सात महिलांसह किमान ३१ जण ठार झाल्याची माहिती लेबनॉनच्या आरोग्य मंत्रालयाने पत्रकार परिषदेत दिली.

इस्रायलने दक्षिण बैरूतच्या दाट लोकवस्तीच्या भागात शुक्रवारी केलेल्या हवाई हल्ल्यात हिजबुल्लाहच्या एका वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्याचा मृत्यू झाल्याची माहिती माध्यमांनी दिली होती. लेबनॉनच्या राजधानीवर गेल्या काही दशकांतील हा सर्वात भीषण हल्ला असल्याचे या अहवालात म्हटले आहे. इस्रायलचे संरक्षणमंत्री योव गॅलंट म्हणाले की, आम्ही आमच्या नागरिकांच्या रक्षणासाठी आमच्या शत्रूंचा पाठपुरावा करत राहू, अगदी दहिया, बैरूतमध्येही.

दरम्यान, गाझा शहरातील विस्थापितांना आश्रय देणाऱ्या शाळेवर इस्रायलने केलेल्या हल्ल्यात २२ पॅलेस्टिनी ठार झाल्याचे वृत्त आहे.

## इन्फोग्राफिक्स

### जम्मू-काश्मिरला राज्याचा दर्जा देणार : काँग्रेस

**कारण राजकारण**

**सत्तेत असताना** भाजपने जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा का बहाल केला नाही, असा सवाल काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केला आहे. तसेच काँग्रेस सत्तेवर आल्यानंतर, जम्मू-काश्मिरला स्वतंत्र दर्जा देण्यात येईल, असे आश्वासनही त्यांनी दिले आहे.



विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अमेरिकेत आरक्षणविरोधी केलेल्या वक्तव्यावर स्पष्टीकरण देताना खर्गे म्हणाले की, जोपर्यंत देशात अस्पृश्यता आणि सामाजिक न्यायाचा अभाव आहे तोपर्यंत देशात आरक्षण कायम राहील. जम्मूत पत्रकार परिषदेत ते म्हणाले की, काँग्रेसने जम्मू-काश्मिरसाठी आपल्या जाहीरनाम्यात सात आश्वासने दिली आहेत. जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा बहाल करणे हे आमचे पहिले प्राधान्य आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्याचा दर्जा बहाल केला जाईल, असे सांगितले आहे, असे विचारले असता खर्गे म्हणाले, भाजपकडे सर्व सत्ता असताना ते काम करण्यात आले नाही, असा प्रश्न त्यांनी केला. तसेच पाच लाख नोकऱ्यांचे भाजपचे आश्वासन केवळ जुमला असल्याचे सांगत खर्गे म्हणाले की, आम्ही एक लाख नोकऱ्यांचे आश्वासन दिले आहे. जम्मू-काश्मीरमध्ये ६५ टक्के पदे रिक्त असून, ही पदे भरून इतर भरती काँग्रेस करेल. राहुल यांना दहशतवादी आणि देशद्रोही म्हटले जात असून पंतप्रधान अशा वक्तव्यांना प्रोत्साहन देत आहेत, असाही आरोप त्यांनी केला. काँग्रेसच्या काळात रेल्वे आणि महामार्ग प्रकल्पांची कामे सुरू झाली. भाजप नेत्यांनी जम्मू-काश्मीरमध्ये काय नवीन काम केले हे सांगावे, असा दावाही त्यांनी केला.

## » Selected

### राहुल गांधींचा भाजपवर आरोप

**नवी दिल्ली :** विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अमेरिकेत शीख समुदायावर केलेल्या वक्तव्याचा संदर्भ घेत भाजप राहुल गांधींसह काँग्रेसवर हल्ला करत आहे. या संदर्भात विविध राज्यात भाजप नेत्यांनी राहुल गांधी यांच्यावर गुन्हे दाखल केले आहेत. दरम्यान, काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सोशल मीडियावर अमेरिकेतील भाषणाचा व्हिडिओ पोस्ट करत स्पष्टीकरण दिले असून, भाजप खोटी माहिती पसरवत आहे, असा आरोप केला आहे. राहुल गांधी म्हणाले की, भाजप अमेरिकेतील माझ्या वक्तव्याबाबत खोटेपणा पसरवत आहे. मला भारतात आणि परदेशात राहणाऱ्या प्रत्येक शीख बंधू-भगिनींना विचारायचे आहे, मी जे काही बोललो त्यात काही चुकीचे आहे का? भारत एक नसावा का? असा देश जिथे प्रत्येक शीख आणि प्रत्येक भारतीय कोणत्याही भीतीशिवाय त्यांच्या धर्माचे पालन करू शकेल?, अशा मजकुरासह त्यांनी पोस्ट शेअर केली आहे.

### नेहरूंच्या कागदपत्रांची मागणी

**नवी दिल्ली :** सोनिया गांधी यांनी नेहरूंची वैयक्तिक कागदपत्रे देण्याची मागणी, पंतप्रधान संग्रहालय आणि ग्रंथालयाच्या (पीएमएमएल) सदस्यांनी सोनिया गांधी यांना पत्र लिहून केली आहे. प्रत्यक्ष पत्रे देता येत नसतील, तर त्यांची प्रत किंवा डिजिटायज्ड ॲक्सेस द्या. अहमदाबादचे इतिहासकार आणि लेखक रिझवान कादरी हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील पीएमएमएल (पूर्वीचे नेहरू मेमोरियल म्युझियम अँड लायब्ररी) चे सदस्य आहेत. दि. ९ सप्टेंबर रोजी सोनिया गांधी यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी लिहिले आहे की, नेहरूंशी संबंधित नोंदी अत्यंत महत्त्वाच्या असून, त्यांच्या अभ्यासामुळे देशाचा इतिहास अधिक चांगल्या प्रकारे समजण्यास मदत होईल. पीएमएल सोसायटीने सोनिया गांधी यांच्याकडे असलेल्या कागदपत्रांच्या स्थितीवर चर्चा केली. त्यानंतर कायदेशीर सल्ला घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## राष्ट्राध्यक्षपदी चिनी डिसानायके यांची निवड

# श्रीलंकेतही चिनी समर्थक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** श्रीलंकेत आर्थिक संकट तसेच राजकीय घडामोडींनंतर राष्ट्राध्यक्षपदाच्या झालेल्या निवडणूक चिनी विचारांच्या नॅशनल पीपल्स पॉवरचे (एनपीपी) अनुरा कुमार डिसानायके यांनी विजय मिळवला आहे. ते राष्ट्रपती होणार हे निश्चित झाले आहे. दिसानायके हे कोलंबोचे खासदार असून, ते नॅशनल पीपल्स पार्टी आणि जेव्हीपीचे नेतृत्व करतात. त्यांनी भारताविरोधात भूमिका घेतली असून, त्यांचा चीनकडे विशेष कल आहे. २०२२ मध्ये श्रीलंकेतील आर्थिक आणि राजकीय संकटानंतर त्यांनी लोकप्रियता मिळवली. गरिबांचा मसीहा, भ्रष्टाचारविरोधी नेता अशी त्यांची प्रतिमा आहे. २०१९ मध्ये त्यांनी राष्ट्रपतीपदाची निवडणूकही लढवली होती.

डिसनायके यांचा मार्क्सवाद आणि लेनिनवादाकडे असलेला कल पाहता ते भारतविरोधी पावले उचलू शकतात, असे मानले जाते. श्रीलंकेतील यादवी युद्धात भारताच्या हस्तक्षेपाला त्यांनी विरोध केला होता. त्याचबरोबर अदानी समूहाचा श्रीलंकेतील प्रकल्प रद्द करू, असे त्यांनी निवडणूक प्रचारादरम्यान सांगितले होते.

डिसानायके यांच्या पक्षाचे संसदेत केवळ तीन नेते असून, त्यांचा पक्ष अर्थव्यवस्थेतील चीनच्या हस्तक्षेपाचे समर्थन करतो. श्रीलंकेतील आर्थिक संकटाला चीनलाही जबाबदार मानले जाते. चीनच्या कर्जाच्या जाळ्यात अडकल्यानंतर श्रीलंकेची अवस्था बिकट झाली, तसेच चीनने वाईट काळात श्रीलंकेला कोणतीही मदत केली नव्हती.

### रेल्वे घातपाताचा आणखी एक प्रयत्न

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**कानपूर :** ट्रेनला घातपात करण्याचा आणखी एक प्रकार घडल्याचे उघडकीस आले. कानपूरच्या महाराजपूर भागात रेल्वे रुळावर गॅस सिलिंडर सापडला. लोको पायलटने सतर्कता दाखवत सिलिंडरला धडक देण्यापूर्वी गाडी थांबवली आणि अपघात टाळला. लूप लाईनवर सिलिंडर ट्रॅकवर ठेवण्यात आला होता. कानपूरमध्ये तिसऱ्यांदा रेल्वे उलटण्याचा कट रचला गेला आहे.

सिलिंडर ट्रॅकवर ठेवण्याची येथे घडलेली ही दुसरी घटना आहे. यापूर्वी कालिंदी एक्स्प्रेसला घातपात करण्यासाठी कानपूर-फर्रुखाबाद मार्गावर सिलिंडर ठेवण्यात आला होता. सुदैवाने, कालिंदी एक्स्प्रेस अपघातातून बचावली. १७ ऑगस्ट रोजी साबरमती एक्स्प्रेसचे २२ डबे रुळावरून घसरले होते.

# झाकीर नाईकला पाकमधून दूरध्वनी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** कट्टरपंथी झाकीर नाईक याला पाकिस्तानातून दूरध्वनी आला आहे. ऑक्टोबरमध्ये तो १५ दिवस पाकिस्तानात राहणार आहे. इस्लामाबाद, लाहोर आणि कराची येथे व्याख्याने देण्यासाठी पाकने त्याला आमंत्रण दिले आहे. एका वृत्तात ही माहिती देण्यात आली आहे.

२०१६ मध्ये भारतातून फरार झालेल्या नाईकवर भारतद्वेष, मनी लॉन्ड्रिंग आणि दहशतवादाचे आरोप आहेत. २० सप्टेंबर रोजी झाकीर नाईकने एक पोस्ट करत पाक दौऱ्याबाबत माहिती दिली आहे. पाकिस्तान सरकारच्या निमंत्रणावरून नाईक पाकिस्तानच्या दौऱ्यावर आहेत.

झाकीरचा मुलगा फारिक हा देखील कट्टरपंथी आहे. माध्यमातील वृत्तानुसार, मोहम्मद अली जिन्ना यांच्या कबरीसमोर असलेल्या बाग-ए-कायदमध्ये कराचीचा कार्यक्रम होणार आहे. हा दौरा कराची येथे ५ ऑक्टोबरपासून सुरू होईल आणि २० ऑक्टोबरला इस्लामाबादमध्ये संपेल, अशी माहिती आहे.

झाकीर नाईक सध्या मलेशियात वास्तव्यास असून तेथून त्याच्या प्रत्यार्पणासाठी भारत प्रयत्नशील आहे. नुकतेच नाईक याने सोशल मीडियाच्या माध्यमातून भारतीय मुस्लिमांना वक्फ दुरुस्ती विधेयक नाकारण्याचे आवाहन केले होते. यानंतर केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी वक्फ दुरुस्ती विधेयकाच्या चर्चेत हस्तक्षेप न करण्याचा इशारा दिला होता.

## वायएसआरच्या पापांचे प्रायश्चित्त

# पवन कल्याणचे व्रत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**विजयवाडा :** तिरुपती मंदिरात सापडलेल्या प्रसादाच्या लाडूंमध्ये जनावरांची चरबी असल्याच्या आरोपावरून देशभरात खळबळ उडाली असताना, आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनी ११ दिवसांचे व्रत सुरू केले आहे. वायएसआर काँग्रेसच्या पापांचे प्रायश्चित करण्यासाठी देवाकडे प्रार्थना करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तिरुपतीच्या लाडूंमध्ये भेसळ झाल्याची घटना उघडकीस आल्यानंतर पवन कल्याण यांनी दु:ख व्यक्त केले. भगवान वेंकटेश्वराला प्रसन्न करण्यासाठी त्यांनी ११ दिवस व्रत करणार असल्याचे सांगितले. गुंटूर जिल्ह्यातील नंबुरू येथील श्री दशावतार व्यंकटेश्वर स्वामी मंदिरात व्रत करून, त्यानंतर ते तिरुमला श्री वेंकटेश्वर स्वामींचे दर्शन घेणार आहेत.

वायएसआर कॉंग्रेस पक्षाच्या सरकारने केलेल्या पापांचे प्रायश्चित करण्यासाठी त्यांनी व्रत ठेवण्याचा संकल्प सोडला आहे. तिरुमला तिरुपती देवस्थानम (टीटीडी) चे कर्मचारी आणि मंडळाचे सदस्य या गैरप्रकारांबद्दल अनभिज्ञ कसे राहू शकतात, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे.

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी नुकत्याच झालेल्या रालोआच्या विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत दावा केला की, वायएसआर काँग्रेस सरकारने तिरुपतीचे लाडू बनविण्यासाठी प्राण्यांच्या चरबीचा वापर केला, असा आरोप त्यांनी केला.

## अमेरिकी प्रचार

राष्ट्र संचार छायाचित्रसेवा



**डेट्रॉइट :** अमेरिकी राष्ट्राक्षपदाच्या उमेदवार आणि उपराष्ट्रपती कमला हॅरिस यांनी मिशिगनमधील डेट्रॉईट येथे एका कार्यक्रमात गोळीबारातील पीडितांचे म्हणणे ऐकून घेतले.

### मला सत्तेचा मोह नाही; केजरीवालांचा दावा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** मला सत्तेचा मोह नाही. मी आयुष्यात फक्त प्रामाणिकपणा कमवला. मी भ्रष्टाचारी असेल तर मला मत देऊ नका, मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मला भ्रष्ट असल्याचे सिद्ध करण्याचा कट रचला आहे, असा आरोप आम आदमी पक्षाचे (आप) नेते आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी केला आहे.दिल्लीतील जंतर-मंतर येथे 'जनता दरबार' कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, मी मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीचा भुकेला नसल्याने मी राजीनामा दिला, असा दावा त्यांनी केला.

# अमेरिकेने परत केल्या २९७ पुरातन वस्तू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौऱ्याला मोठे यश मिळाले आहे. अमेरिकेने भारतीय संस्कृतीशी संबंधित २९७ दुर्मिळ वस्तू परत केल्या आहेत. त्यांची तस्करी करण्यात आली होती. मौल्यवान आणि पुरातन वस्तूंची तस्करी ही फार पूर्वीपासून गंभीर समस्या आहे. २०१४ पासून भारताला परदेशातून सुमारे ६४० वस्तू परत मिळाल्या आहेत.

पंतप्रधान मोदी यांनी समाज माध्यमांवर याबाबत पोस्ट करत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बायडेन यांचे आभार मानले. अवैध तस्करी आणि सांस्कृतिक संबंधांविरोधातील लढा अधिक बळकट होत असल्याचे मोदी म्हणाले. २९७ कलाकृती परत केल्याबद्दल आम्ही राष्ट्राध्यक्ष बायडेन आणि अमेरिकन सरकारचे आभारी आहोत, असेही त्यांनी नमूद केले. याआधीही मोदींच्या अमेरिका दौऱ्यात अनेक पुरातन वस्तू सुपूर्द करण्यात आल्या होत्या. २०२१ मध्ये जेव्हा ते अमेरिकेला गेले, तेव्हा १५७ वस्तू परत करण्यात आल्या होत्या यात बाराव्या शतकातील नटराजाच्या पुतळ्याचाही समावेश होता. २०२३ मध्ये पंतप्रधान मोदींच्या दौऱ्यानंतर अमेरिकेने १०५ वस्तू परत केल्या. केवळ अमेरिकेतून ५७८ प्राचीन आणि मौल्यवान वस्तू भारतात परत आल्या आहेत.

# गुप्तचर खात्याने आढावा घ्यावा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** गुप्तचर विभागाने गेल्या पाच वर्षांत देशभरातील संवेदनशील आणि महत्त्वाच्या आस्थापनांच्या श्रेणींचा आढावा न घेतल्याने त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी असलेल्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाने (सीआयएसएफ) यासंदर्भात केंद्रीय गृह मंत्रालयाला विनंती केली आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सीआयएसएफ आपल्या तैनातीचा आढावा घेण्याची योजना आखत असून, यात विविध आस्थापनांना त्यांच्या श्रेणींमध्ये अपग्रेड किंवा डाउनग्रेड करणे समाविष्ट आहे. मात्र, महामारीमुळे गुप्तचर विभागाने महत्त्वाच्या आस्थापनांचा आढावा घेण्यास उशीर केल्याने सीआयएसएफला हे काम करता आले नाही. रिफायनरी आणि विमानतळे, बंदरे, पोलाद प्रकल्प, खत युनिट्स, पॉवर प्लांट आणि संवेदनशील इमारतींच्या सुरक्षेची तपासणी करणे आवश्यक आहे.

## अनेक रेल्वे गाड्या केल्या रद्द

# बिहारला पूराचा तडाखा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**पाटणा :** बिहारमधील भागलपूर जिल्ह्यातील पुलाच्या गर्डरला पाणी लागल्याने, अनेक रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या असून अनेकांचे मार्ग बदलण्यात आले आहेत.

बिहारमधील अनेक जिल्ह्यांमध्ये गंगा नदी धोक्याची पातळी ओलांडून वाहत असल्याने, भागलपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पूर स्थिती निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी पाणी साचले असून अनेक शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांच्या आवारात पाणी शिरले आहे. तसेच वाढत्या पाण्याच्या पातळीमुळे एनएच-८० चा काही भाग वाहून गेला आहे.

सुलतानगंज आणि रतनपूर स्थानकांदरम्यान पूल १९५ च्या गर्डरला पुराचे पाणी लागल्याने, अनेक गाड्या रद्द करण्यात आल्या असून जमालपूर-भागलपूर विभागातून जाणाऱ्या अनेकांचे मार्ग बदलण्यात आले आहेत. शनिवारी रात्री पावणेअकराच्या सुमारास पुराचे पाणी पुलाच्या गर्डरला भिडले. याशिवाय जमालपूर-भागलपूर विभागात काही ठिकाणी अनेक नद्या धोक्याची पातळी ओलांडून वाहत आहेत. पाटणा-दुमका एक्स्प्रेस, सरायगढ देवघर स्पेशल, जमालपूर-किउल मेमू स्पेशल आणि भागलपूर-दानापूर इंटरसिटी एक्स्प्रेस रद्द करण्यात आल्या आहेत.

अजमेर-भागलपूर एक्स्प्रेस, विक्रमशिला एक्स्प्रेस, हावडा-गया एक्स्प्रेस, सुरत-भागलपूर एसएफ एक्स्प्रेस, आनंद विहार-मालदा टाऊन एक्स्प्रेस आणि ब्रह्मपुत्रा मेल या गाड्या सोडण्यात आल्या आहेत. दरम्यान, शनिवारी मुझफ्फरपूर जंक्शनच्या यार्डात रेल्वेचे इंजिन रुळावरून घसरले.

## देशभरात गोरगरिबांचे हाल होत असल्याचा केला दावा

# चलनी नोटांचा तुटवडा, काँग्रेसची चिंता

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** काँग्रेसचे उपाध्यक्ष मणिकम टागोर यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना पत्र लिहून छोट्या नोटांच्या तुटवड्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. ते म्हणाले की, बाजारात छोट्या नोटांचा तुटवडा निर्माण झाला असून त्यामुळे गरिबांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. टागोर म्हणाले की, १०, २० आणि ५० रुपयांच्या नोटांच्या तुटवड्यामुळे ग्रामीण आणि शहरी गरिबांचे हाल होत आहेत.

यूपीआय आणि कॅशलेस व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (आरबीआय) या नोटांची छपाई बंद केल्याचे वृत्त आहे, असे टागोर यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे. डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देण्याची कल्पना समजण्याजोगी आहे, पण त्याचा फटका आता डिजिटल पेमेंट न वापरणाऱ्यांना बसत आहे. विशेषतः ग्रामीण भारतातील जनतेला अडचणींचा सामना करावा लागत आहे. या निर्णयामुळे चलन मिळण्याच्या मूलभूत अधिकाराचेही उल्लंघन झाल्याचे ते म्हणाले. छोट्या नोटा कमी झाल्याने छोट्या व्यवसायांनाही फटका बसत आहे. रोजंदारीवर काम करणारे कामगार, फेरीवाले केवळ रोख रकमेवर अवलंबून आहेत. छोट्या नोटांची छपाई सुरू करण्याचे निर्देश आरबीआयला द्यावेत, अशी मागणी त्यांनी अर्थमंत्र्यांकडे केली. याशिवाय गावोगावी डिजिटल पेमेंट इन्फ्रास्ट्रक्चरकडेही लक्ष द्यायला हवे, असेही त्यांनी नमूद केले आहे.

देशात चार ठिकाणी कागदी नोटा छापल्या जातात. चलन व्यवस्थापन विभाग (डीओपी) आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार नोटांची छपाई करतो. यातील दोन करन्सी नोट प्रेस भारत सरकारच्या मालकीचे असून दोन रिझर्व्ह बँकेच्या मालकीचे आहेत. नाशिक आणि देवास येथे भारतासोबत नोटप्रेस आहेत. म्हैसूर आणि सालबोनी प्रेस भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मालकीचे आहेत.



पंत कठीण काळातून गेला आहे. त्याने ज्या पद्धतीने या गोष्टींना तोंड दिले ते आश्चर्यकारक आहे. त्याला हे स्वरूप सर्वात जास्त आवडते. तो किती कर्तबगार होता हे आम्हाला नेहमीच माहीत होते. त्याला खेळासाठी वेळ देणे ही बाब होती. आम्हाला कोणत्याही परिस्थितीत अशीच टीम तयार करायची आहे. वेगवान गोलंदाजी किंवा फिरकीमध्ये आमच्याकडे पर्यायांची कमतरता नसावी अशी आमची नेहमीच इच्छा असते. ही खेळपट्टी अगदी सोपी होती. वेगवान गोलंदाजांसाठी आणि फिरकीपटूंनाही खूप मदत मिळाली. ही अशी खेळपट्टी होती जिथे तुम्हाला संयम दाखवावा लागतो. अश्विन सदैव तुमच्या सोबत आहे. काय करावे आणि काय करू नये तो सांगत राहतो.

— रोहित शर्मा

### बांगलादेशचा २८० धावांनी पराभव : अश्विनचे शतक, ६ बळीही

# भारताचा ऐतिहासिक विजय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**चेन्नई :** भारतीय संघाने दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या कसोटी सामन्यात बांगलादेशचा तब्बल २८० धावांनी पराभव केला आहे. भारताने बांगलादेशला विजयासाठी ५१५ धावांचे आव्हान दिले होते आणि २३४ धावांवर बांगलादेशला ऑल आऊट करत कसोटी मालिकेत १-० ने आघाडी मिळवली आहे. रविचंद्रन अश्विनच्या ६ विकेट्सच्या जोरावर भारताने दुसऱ्या डावात एकतर्फी दबाव आणला.

भारत आणि बांगलादेश यांच्यातील पहिला कसोटी सामना टीम इंडियाने मोठ्या सहजतेने जिंकला. भारताच्या विजयात आर अश्विनची भूमिका महत्त्वाची होती. आर अश्विनने पहिल्या डावात शतक झळकावत भारताचा डाव सावरला आणि दुसऱ्या डावात विक्रमी ६ विकेट्स घेत भारताला ऐतिहासिक विजय मिळवून देण्यात मोलाची भूमिका बजावली आहे.

बांगलादेशला हरवून भारताने कसोटी क्रिकेटमध्ये मोठी कामगिरी केली आहे. भारतीय क्रिकेट संघाने १९३२ साली कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. तेव्हापासून भारताने एकूण ५८० सामने खेळले आहेत. ९२ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच टीम इंडियाने पराभवापेक्षा जास्त विजयाचा आकडा गाठला आहे. बांगलादेशचा पराभव करून टीम इंडियाने कसोटी क्रिकेटमधील १७९वा विजय संपादन केला आहे. तर, संघाला १७८ सामन्यांत पराभवाचा सामना करावा लागला आहे. आतापर्यंत भारतातील कसोटी क्रिकेटच्या ९२ वर्षांच्या इतिहासात असे घडले नव्हते. भारताने २२२ सामने अनिर्णित खेळले आहेत, तर भारताचा एक सामना रद्द झाला आहे.

कसोटी क्रिकेटमध्ये पराभवापेक्षा जास्त विजय नोंदवणारा भारत हा जगातील पाचवा संघ ठरला आहे. याआधी ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका आणि पाकिस्तानच्या संघांनी अशी कामगिरी केली आहे. ऑस्ट्रेलियाने ८६६ सामन्यांपैकी ४१४ सामने जिंकले आहेत आणि २३२ सामने गमावले आहेत. इंग्लंड संघाने १०७७ सामन्यांपैकी ३९७ सामने जिंकले असून ३२५ सामने गमावले आहेत. त्याच वेळी, दक्षिण आफ्रिकेच्या संघाने ४६६ कसोटी सामन्यांपैकी १७९ सामने जिंकले आहेत आणि १६१ सामने गमावले आहेत. याशिवाय ४५८ सामन्यांपैकी पाकिस्तानने १४८ सामने जिंकले असून १४४ सामने गमावले आहेत.

#### शांतो म्हणाला- मी जास्त वेळ खेळण्याचा प्रयत्न करत होतो

● हसन आणि तस्किन यांनी चांगली गोलंदाजी केली आणि दोघांनीही चांगली फलंदाजी केली. आमची गोलंदाजी चांगली होती, पण आम्हाला सातत्य राखावे लागेल. मी जास्तीत जास्त वेळ फलंदाजी करण्याचा प्रयत्न करत होतो. ही आमच्यासाठी खूप महत्त्वाची मालिका आहे. पुढच्या सामन्यात आम्ही काहीतरी चांगले करू अशी आशा आहे.

## चेस ऑलिम्पियाडमध्ये भारतीय पुरूष संघाची मोठी कामगिरी

**नवी दिल्ली :** बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये दोन्ही भारतीय संघ (पुरुष आणि महिला) खुल्या विभागात आणि महिला विभागात ऐतिहासिक सुवर्णपदक जिंकण्याच्या जवळ आले आहेत. बुद्धिबळातील राष्ट्रीय संघासाठी ही सर्वात प्रतिष्ठित सांघिक स्पर्धा आहे.



ग्रँडमास्टर आणि वर्ल्ड चॅम्पियनशिप चॅलेंजर डी गुकेशने बुडापेस्टमधील ४५ व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये यूएसएच्या फॅबियानो कारुआनाचा पराभव करून भारतीय पुरुष संघाचे सुवर्णपदक जवळजवळ निश्चित केले. बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारतीय पुरुष संघ प्रथमच सुवर्णपदक जिंकणार आहे. रविवारी २२ सप्टेंबर २०२४ रोजी होणाऱ्या अंतिम फेरीत दोन्ही भारतीय संघ ऑलिम्पियाड क्रमवारीत अव्वल आहेत. ओपन सेक्शन संघाने शनिवारी, २१ सप्टेंबर २०२४ रोजी रात्री उशिरा (भारतीय वेळेनुसार) अमेरिका संघाचा पराभव केला. अमेरिका या स्पर्धेत अव्वल मानांकित संघ आहे, परंतु अंतिम टप्प्यात त्यांना चांगली कामगिरी करता आली नाही. नोव्हेंबर २०२४ मध्ये सिंगापूरमध्ये पुढील जागतिक चॅम्पियनशिप सामना खेळण्यासाठी सज्ज असलेल्या डी गुकेशने भारतासाठी जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या फॅबियानो कारुआनाचा पराभव केला, तर अर्जुन इरिगासीने आणखी एका मॅरेथॉन खेळानंतर वेस्ली सोकडून प्रज्ञानंदच्या पराभवाचा बदला घेतला. विदित गुजराथीने लेव्हॉन अरोनियनविरुद्ध ड्रॉ सामना खेळला. भारतीय महिला संघ १०व्या फेरीत बुद्धिबळ ऑलिम्पियाड क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर होता. महिला संघाने कमकुवत समजल्या जाणाऱ्या चीन संघाचा पराभव केला, त्या संघात टॅन झोंगी, हौ यिफान, झू वेनजुन आणि लेई टिंगजी सारख्या सर्व अव्वल खेळाडूंचा समावेश नव्हता, जे एकतर महिला वर्ल्ड चॅम्पियन होते किंवा महिला वर्ल्ड चॅम्पियनचे दावेदार होते.

## ऑस्ट्रेलियाने इंग्लंडला दुसऱ्या वन-डेत पाजलं पराभवाचं पाणी

**नवी दिल्ली :** वन -डे मालिकेतील दुसऱ्या सामन्यातही ऑस्ट्रेलियाने इंग्लंडवर धुंवाधार विजय मिळवला आहे. पहिल्या सामन्यात ७ विकेट्सने इंग्लंडवर मात केल्यानंतर दुसरा सामनाही ऑस्ट्रेलियाने ६८ धावांनी आपल्या नावे केला आहे. ५ सामन्यांच्या या मालिकेमध्ये सलग २ सामने जिंकत ऑस्ट्रेलियाने मालिकेमध्ये



२-० आघाडी घेतली आहे. ऑस्ट्रेलियाकडून प्रथम फलंदाजीसाठी आलेले मॅथ्यू शॉर्ट आणि ट्रॅव्हिस हेड प्रत्येकी २९ धावा करून परतले, तर तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आलेल्या कर्णधार मिचेल मार्शने ५९ चेंडूत ६० धावांची संघाला सावरणारी खेळी केली. त्याला ६७ चेंडूत ७४ धावा करणाऱ्या ॲलेक्स कॅरीची साथ मिळाली. या अर्धशतकीय खेळीमुळे ऑस्ट्रेलियाला २७० धावा उभारता आल्या. ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांना रोखताना इंग्लंडचा वेगवान गोलंदाज ब्रायडन कार्सला ३ विकेट्स घेण्यात यश आले. गोलंदाज मॅथ्यू पोट्स, जेकब बेथेल व आदिल रशिद यांना प्रत्येकी २ विकेट्स मिळाले. तर ऑली स्टोनला १ विकेट मिळाला. २७१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या इंग्लंडच्या सलामीवीरांना फारशी चांगली कामगीरी करता आलेली नाही. फील सॉल्ट (१२), तर बेन डकेट (३२) धावा करत माघारी परतला. जेमी स्मिथचे अर्धशतक एका धावेने हुकले आणि इंग्लंडच्या कोणत्याच फलंदाजाला जास्त वेळ मैदानावर टीकता आले नाही. इंग्लंडचा डाव ऑस्ट्रेलियन गोलंदाजांनी २०२ धावांवरच गुंडाळला. दरम्यान वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कला ३ विकेट्स घेता आले. जोश हेझलवूड, ॲरॉन हार्डी व ग्लेन मॅक्सवेलला प्रत्येकी २ विकेट्स मिळाले, तर ॲडम झम्पाने १ विकेट घेतला. इंग्लंड-ऑस्ट्रेलियाचा पुढील वन-डे सामना २४ सप्टेंबर रोजी असून इंग्लंडला मालिकेमध्ये टिकून राहण्यासाठी हा सामना जिंकावाच लागेल.

## हॉकी महाराष्ट्राचे आश्वासक पदार्पण

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** हॉकी महाराष्ट्राने महापौर राधाकृष्णन हॉकी स्टेडियम, एग्मोर येथे सुरू झालेल्या स्पर्धेत प्रतिष्ठित अखिल भारतीय एमसीसी-मुरुगप्पा गोल्ड कप 2024 मध्ये ऐतिहासिक विजयी पदार्पण केले.

95 वर्षांच्या स्पर्धेच्या इतिहासात हॉकी महाराष्ट्र संघ प्रथमच सहभागी झाला असून सलामीच्या लढतीत ब गटात तुलनेत बलाढ्य भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडवर 5-4 अशी मात केली.

हॉकी महाराष्ट्रने माजी विजेता बीपीसीएलवर 0-2 अशा पिछाडीवरून विजय तेजस चव्हाण (11वा) आणि राजिंदर सिंगने(15वा) बीपीसीएलला सुरुवातीला मोठी आघाडी मिळवून दिली. मध्यंतरापूर्वी, मयूर धनावडेने(22वा) प्रतिस्पर्ध्यांची आघाडी थोडी कमी केली.

तिसऱ्या आणि चौथ्या क्वार्टरमध्ये, सुनील सोमवरपेट (40व्या) बीपीसीएलची आघाडी 3-1 अशी वाढवली. त्यानंतर चार गोल करताना हॉकी महाराष्ट्रने चार गोल करताना बाजी पलटवली. कनिष्ठ वर्ल्डकप खेळलेला आदित्य लालगे आणि स्टीफन स्वामीच्या (45वे, 46वे) प्रत्येकी दोन गोलांमुळे हॉकी महाराष्ट्राने 5-3 अशी आघाडी घेतली. शेवटच्या क्वार्टरमध्ये वरुण कुमारने पेनल्टी स्ट्रोकचे गोलात रूपांतर करून आघाडी कमी केली तरी हॉकी महाराष्ट्रने 5-4 असे वर्चस्व राखले. खेळ संपायला चार मिनिटे शिल्लक असताना बीपीसीएलला बरोबरी साधण्याची संधी होती. पण वरुणचा स्ट्रोक गोलरक्षक शिवरत्न रसाळने अचूकपणे अडवत महाराष्ट्राला संस्मरणीय विजय मिळवून दिला.

### चेन्नई कसोटीत रचला इतिहास

## अश्विन 'अण्णा'ने अनिल कुंबळेला टाकले मागे!

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात भारतीय संघाने शानदार विजय मिळवला आहे. ५१५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना बांगलादेशला दुसऱ्या डावात केवळ २३४ धावा करता आल्या, त्यामुळे भारताने २८० धावांनी सामना जिंकला. यादरम्यान भारतीय गोलंदाजांनी दोन्ही डावात चमकदार कामगिरी करत बांगलादेशच्या फलंदाजांना जखडून ठेवले. अशा परिस्थितीत पहिल्या डावात गोलंदाजी करताना वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने सर्वाधिक ४ बळी घेतले, तर दुसऱ्या डावात अश्विन 'अण्णा'ने अप्रतिम गोलंदाजी करत २१ षटकात ८८ धावा देत सर्वाधिक ६ बळी घेतले. यासह त्याने चेन्नई कसोटीत मोठ्या विक्रमाची नोंद केली.

अश्विनच्या शानदार गोलंदाजीमुळे भारताने हा सामना जिंकला. या विजयामुळे जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीतील प्रवेश अगदी जवळ आला आहे. अशा परिस्थितीत आर अश्विन आता कसोटी सामन्याच्या एका डावात ५ किंवा त्याहून अधिक बळी घेणारा भारतीय गोलंदाजाचा सर्वात वयस्कर गोलंदाज ठरला आहे. अश्विनने या यादीत माजी भारतीय दिग्गज अनिल कुंबळे आणि विनू मांकड यांना मागे टाकले आहे. अश्विनने चेन्नई कसोटीत बॉल आणि बॅटने अप्रतिम कामगिरी केली आहे. पहिल्या डावात फलंदाजी करताना त्याने शानदार शतक झळकावले होते. त्याच्या या दमदार कामगिरीने भारतीय डाव सावरला होता.

#### अश्विनने कोर्टनी वॉल्शला टाकले मागे

● आर अश्विन हा कसोटी डावात 5 बळी घेणारा सर्वात वयस्कर भारतीय गोलंदाज ठरला आहे. यासह त्याने माजी कॅरेबियन दिग्गज गोलंदाज कोर्टनी वॉल्श यांचा विक्रम मोडीत काढला आहे. वॉल्श यांच्या नावावर कसोटी क्रिकेटमध्ये एकूण 519 विकेट्स आहेत. आता अश्विन त्यांच्या पुढे गेला असून त्याच्या नावावर 522 विकेट्स जमा झाल्या आहेत. यास तो सर्वाधिक बळी घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत 8व्या स्थानी पोहचला आहे. त्याच्या पुढे ऑस्ट्रेलियन फिरकीपटू नॅथन लायन (530 विकेट) आहे.

## हरमनप्रीतला जागतिक हॉकीमधील सर्वोत्तम खेळाडूसाठी नामांकन

**नवी दिल्ली :** पॅरिसमध्ये सलग दुसरे ऑलिंपिक ब्राँझपदक मिळवून देणारा भारतीय कर्णधार हरमनप्रीत सिंग याला जागतिक हॉकीमधील सर्वोत्तम खेळाडूसाठी नामांकन देण्यात आले आहे. हुकमी ड्रॅग फ्लिकर



म्हणून दरारा निर्माण करणाऱ्या हरमनप्रीतने ऑलिंपिकमध्ये आठ सामन्यांतून सर्वाधिक १० गोल केलेले आहेत. हॉकी क्षेत्रातील हा प्रतिष्ठेचा पुरस्कार हरमनप्रीतला २०२० आणि २०२२ मध्येही मिळालेला आहे. सर्वोत्तम हॉकी खेळाडूसाठीच्या या पुरस्कारासाठी पुन्हा नामांकन मिळणे हा मोठा सन्मान असल्याचे हॉकी इंडियाने म्हटले आहे. तर हॉकी विश्वातील नामवंत खेळाडूंमध्ये आपलाही समावेश झाला आहे आणि हे माझ्या संघसहकाऱ्यांशिवाय शक्य नाही, असे हरमनप्रीत म्हणाला. पॅरिस ऑलिंपिकमध्ये मी केलेल्या सर्व गोलांमध्ये सहकाऱ्यांचा मोठा वाटा आहे. त्यांनी निर्माण केलेल्या संधींमुळे मी गोल करू शकलो, असेही हरमनप्रीतने सांगितले. हरमनप्रीतसह या पुरस्काराच्या शर्यतीत नेदरलँडसचे थिएरी ब्रिंकमन, जोएप डी मोल, जर्मनीचा हनेस मुल्लेर आणि इंग्लंडचा झॅच वॉलेन्स हे खेळाडू आहेत. वर्षातील सर्वोत्तम हॉकी खेळाडूची निवड करताना २०२४ मध्ये झालेल्या सर्व सामन्यांचा विचार केला जाणार आहे. त्यात कसोटी सामने, प्रो हॉक लीग, हॉकी नेशन्स कप, ऑलिंपिक पात्रता स्पर्धा आणि ऑलिंपिकमधील सामने यांचा समावेश आहे.

### दुलीप ट्रॉफी २०२४-२५ स्पर्धा

## अय्यरच्या संघाने चाखली विजयाची चव; अर्शदीपचे 6 बळी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दुलीप ट्रॉफी २०२४-२५ स्पर्धेतील तिसऱ्या आणि अखेरच्या फेरीत भारत ड संघाने भारत ब संघाविरुद्ध २५७ धावांनी मोठा विजय मिळवला. श्रेयस अय्यर कर्णधार असलेल्या भारत ड संघाचा हा या स्पर्धेतील पहिला विजय आहे. त्यांना या आधी भारत अ आणि भारत क संघाविरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला होता. या विजयामुळे आता भारत ड संघाचेही ६ गुण झाले आहेत. दरम्यान, या विजयामुळे ऋतुराज गायकवाड कर्णधार असलेल्या भारत क संघाला फायदा होऊ शकतो.

कारण भारत ड संघाने विजय निश्चित केले असल्याने भारत ब संघ ७ गुणांवरच कायम राहणार आहे. जर भारत ब संघाने विजय मिळवला असता किंवा पहिल्या डावातील आघाडीसह सामना अनिर्णित राखला असता, तर त्यांना पॉइंट्स टेबलमध्ये अव्वल स्थान मिळवून विजेतेपदाची दावेदारी सांगता आली असती.



पण आता ते दुसऱ्या क्रमांकावर कायम राहिले असल्याने त्यांची विजेतेपदाची संधी हुकली आहे. याशिवाय भारत ड संघही ६ गुणांवर कायम असल्याने त्यांनाही विजेतेपद जिंकता येणार नाही.

आता विजेतेपदासाठी भारत क आणि भारत अ संघात सुरू असलेल्या सामन्यावर सर्वांची नजर आहे. जर या सामन्यात भारत क संघाने विजय मिळवला, तर ते विजेतेपदावर १५ गुणांसह हक्क सांगतील. पण जर त्यांना सामना अनिर्णित राखण्यात यश मिळाले, तर त्यांना एकच गुण मिळणार आहे, कारण या सामन्यात भारत अ संघाने पहिल्या डावात आघाडी मिळवली आहे.

या आघाडीमुळे सामना अनिर्णित राहिला, तर भारत अ संघाला ३ गुण मिळणार आहेत, तर भारत क संघाला एक गुण मिळणार आहे. पण हा एक गुणही भारत क संघाला विजेतेपद मिळवून देण्यास पुरेसा असणार आहे. कारण भारत क संघाचे सध्या ९ गुण असल्याचे एक गुण मिळाल्यानंतर त्यांचे १० गुण होतील.

## रिषभ पंतनं केली महेंद्रसिंह धोनीच्या विक्रमाची बरोबरी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारत आणि बांगलादेश यांच्यात पहिली कसोटी चेन्नईत सुरु आहे. भारतानं या सामन्यावर वर्चस्व मिळवलं आहे. बांगलादेश विरुद्ध भारताच्या युवा फलंदाजांनी दमदार कामगिरी केली. रिषभ पंत आणि शुभमन गिल यांनी शतकी खेळी केली. रिषभ पंतनं दमदार खेळी करत भारताचा डाव सावरला. त्यानं १३ चौकार आणि ४ षटकारांच्या जोरावर १२८ बॉलमध्ये १०९ धावा केल्या आहेत. रिषभ पंतचं हे कसोटी क्रिकेटमधील सहावं शतक ठरलं. रिषभनं या कामगिरीच्या जोरावर महेंद्रसिंह धोनीच्या विक्रमाची बरोबरी केली आहे.

रिषभ पंतनं कसोटीमध्ये दमदार कमबॅक केलं आहे. रिषभ पंतसाठी चेन्नई कसोटी महत्त्वाची आहे. दिल्लीहून डेहराडूनला जाताना रिषभ पंतचा भीषण अपघात झाला होता. तेव्हापासून जवळपास ६३४ दिवसानंतर भारताकडून कसोटी खेळण्यासाठी रिषभ चेन्नईच्या मैदानावर उतरला. बांगलादेश विरूद्धच्या कसोटीत दुसऱ्या डावात शतकी खेळी केली. रिषभ पंतला शतकी खेळीनंतर मेहदी हसन मिराज यानं बाद केलं. रिषभ पंतनं भारताचा माजी कॅप्टन महेंद्रसिंह धोनी यांच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. धोनीनं भारतासाठी ९० कसोटी सामने खेळले.

### अंडर-१९ : कर्णधार अमन आणि कार्तिकेयचे अर्धशतक; मोहम्मद इनानने घेतले ४ बळी

## भारताने ऑस्ट्रेलियाचा ७ गडी राखून केला पराभव

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पुढील विश्वचषकापूर्वी भारताच्या अंडर-१९ संघाने विजयी सुरुवात केली आहे. पुद्दुचेरी येथे झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात संघाने ऑस्ट्रेलियाचा ७ गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना कांगारू संघाने १८४ धावा केल्या, भारताने ३६ षटकात केवळ ३ गडी गमावून लक्ष्य गाठले.

भारताकडून मोहम्मद इनानने ४ बळी घेतले. केपी कार्तिकेयनेही २ विकेट घेत ८५ धावांची इनिंग खेळली. या कामगिरीसाठी त्याला सामनावीराचा पुरस्कार मिळाला. तर कर्णधार मोहम्मद अमानने ५८ धावांची खेळी केली.

पुद्दुचेरीमध्ये भारताच्या अंडर-१९ संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाने ८व्या षटकात कर्णधार सायमन बजची विकेट गमावली, बज केवळ १० धावा करू शकला. त्याच्यानंतर रिले किंगसेल ३६, जॅक कर्टन १७, एडिसन शेरीफ १ आणि एडन ओ'कॉनर २ धावा करून बाद झाले. संघाने ८२ धावांत ५ विकेट गमावल्या.

तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या स्टीव्ह



होगनने ९४ चेंडूत ४२ धावांची खेळी करत संघाला १३० धावांच्या पुढे नेले. त्याच्यासमोर ऑली पॅटरसन, लिंकन हॉब्स ८ आणि हेडन शिलर १६ धावा करून बाद झाले. शेवटी थॉमस ब्राउनने २९ धावा करत संघाला १८४ पर्यंत नेले.

भारत-अ संघाकडून मोहम्मद इनानने ४ बळी घेतले, तर केपी कार्तिकेयने २ बळी घेतले. समर्थ नागराज, चेतन शर्मा, हार्दिक राज आणि किरण कोरमले यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

१८५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या भारताच्या अंडर-१९ संघाची सुरुवात खराब झाली. संघाने ५ षटकांत ३२ धावांत ३ विकेट गमावल्या. रुद्र पटेल १०, साहिल पारीख ४ आणि अभिज्ञान कुंडू १४ धावा करून बाद झाले. आघाडीचे ३ फलंदाज लवकर बाद झाल्यानंतर केपी कार्तिकेयसह कर्णधार मोहम्मद अमानने डावाची धुरा सांभाळली.

अमन आणि कार्तिकेय यांनी १५३ धावांची भागीदारी केली आणि ३६ षटकांत संघाला विजय मिळवून दिला. अमन ५८ आणि कार्तिकेय ८५ धावा करून नाबाद राहिला. ऑस्ट्रेलिया अंडर-१९ कडून ऑली पॅटरसनने २ विकेट घेतल्या, तर एडन ओ'कॉनरला एक विकेट मिळाली.